बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक २२ | बुधवार,दि. १० मे २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

## औटघटकेच्या बदल्यांकरीता बदली कार्यशाळेची नौटंकी कशाला?

**गोंदिया** : जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाच्यावतीने दरवर्षी प्रशासकीय व विनंती बदल्या केल्या जातात.मात्र त्या बदल्या म्हणजे कागदी घोडे हलविणे असेच झाले आहे.गेल्या अनेक वर्षापासून बदली झालेले कर्मचारी सामान्य प्रशासन,बांधकाम,आरोग्य,शिक्षण व वित्त विभागातच ठाण मांडून बसले आहेत.

ज्या पंचायत समित्यामध्ये या कर्मचाऱ्यांची बदली करण्यात येते,त्याठिकाणी हे मातब्बर कमीशन व अधिक पैशा कमविण्याच्या मोहापायी फक्त रूजू होऊन दुसऱ्याच दिवशी परत येतात.किंवा पदाधिकारी यांच्याजवळ असलेल्या काही कंत्राटदारांना हाताशी धरुन आपली प्रतिनियुक्ती करुन घेत असल्याने तिरोडा,सडक अर्जुनी,देवरी सारख्या पंचायत समित्या नाममात्र ठरल्याने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जि.प.अध्यक्षांनी या पंचायत समित्यांना बंद करण्याचाच निर्णय घेतला की काय असे वाटू लागले आहे.

कार्यशाळेनंतर झालेल्या बदलीनुसार,कर्मचाऱ्यांना बदलीस्थळी रुजू होणे गरजेचे आहे.मात्र,तसे झाले नाही. अनेकजण अजूनही जुन्याच जागी ठाण मांडून आहेत. असे असतानाच सार्वत्रिक बदल्यांची कार्यशाळा १० मे रोजी आयोजित केली आहे. जिल्हा परिषदेत विभागनिहाय फेरआढाव्याची गरज असून विविध विभागात कार्यरत कर्मचारी किती वर्षापासून एकाच ठिकाणी ठाण मांडून आहेत. याचा विभागनिहाय फेरआढावा घेण्याची गरज आहे.जिल्हा परिषद प्रशासनाने गैरप्रकारांना आळा बसावा,तसेच कर्मचाऱ्यांची विभागातील मक्तेदारी कमी व्हावी,यासाठी तीन वर्षाहून अधिक काळापासून एकाच टेबलवर कार्यरत कर्मचाऱ्यांची बदली करण्याचे आदेश काढले जातात.त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येताता.

परंतु काही विभागप्रमुखांनी



मर्जीतील कर्मचाऱ्यांची बदली केली;पण टेबल जुनाच कायम ठेवल्याची माहिती आहे. या प्रकरणाची जिल्हा परिषद वर्तुळात जोरदार उलटसुलट चर्चा सुरु आहे.

जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात बग्गा नामक कंत्राटदाराचा टेंडर घोटाळा उघडकीस आला. यातील सूत्रधार कर्मचारी हे प्रतिनियुक्तीवर आले असून आजही त्याठिकाणी कार्यरत आहेत.सोबतच गेल्या चार पाच दिवसापुर्वी परत याच बांधकाम विभागात काही कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती करण्यात आली.जेव्हा बांधकाम विभागातील आस्थपनेचा विचार करता एकही कर्चमारी प्रतिनियुक्तीवर नियुक्त करण्याची गरज नाही.मात्र कंत्राटदाराकडून कमीशनच्या रुपात पैशा कमविण्यासाठीच काही विशेष कर्मचारी वर्गलाच हे काम येते बाकीचे कर्मचारी हे आळशी व कामचोर असल्याचे भासवून त्यांची बोळवण करु प्रतिनियुक्तीचा गोरखधंदा सुरु करण्यात आला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जिल्हा परिषद प्रशासनावर पकड मजबूत नसल्याने कुणीही कर्मचारी कधीही आपली प्रतिनियुक्ती पदाधिकाऱ्यांजवळ असलेल्या विशेष कंत्राटदाराच्या माध्यमातून विशेष टेबल मिळवून घेत असल्याचे गेल्या काही वर्षापासून बघावयास मिळते.जोपर्यंत खमक्या आणि कडक भूमिका घेत निर्णय घेणारा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदेला मिळणार नाही,तोपर्यंत याठिकाणी जिल्हा परिषदेत प्रतिनियक्तीवरील कर्मचारी वर्गाची संख्या अधिक होऊन पंचायत समित्या बंद झाल्याचे चित्र बघावयास मिळाल्यास नवल नाही असेच म्हणावे लागेल.

काही विभागात अधिकाऱ्यांच्या मर्जीतील कर्मचारी आपला टेबल सोडण्यास तयार नाही. काही विभागात पद व अधिकारापेक्षा कोणता टेबल कुणाकडे आहे. याला अधिक महत्त्व आहे. यावर 'अर्थपूर्ण 'व्यवहार अवलंबून असल्याचं बोललं जातं. यातूनच बग्गा कंत्राटदाराचा टेंडर घोटाळ्यासारखे प्रकार घडतात.या घोटाळ्याची व्याप्ती वाढत असतानाही प्रतिनियुक्त्या कायम ठेवत बदल्यांची औपचारिकता पूर्ण केली जात आहे.प्रशासनाने याला आळा घालण्याची गरज असल्याचं बोललं जात आहे.

विभागनिहाय फेरआढाव्याची गरज जिल्हा परिषदेच्या विविध विभागात कार्यरत कर्मचारी किती वर्षांपासून एकाच ठिकाणी ठाण मांडून आहेत. याचा विभागनिहाय फेरआढावा घेण्याची गरज आहे. तीन वर्षाहून अधिक कालावधीपासून एकाच टेबलवर असलेल्या कर्मचाऱ्यांची तातडीने उचलबांगडी करण्याची गरज आहे.

## सावरकरांचा जन्मदिन "गौरव दिवस' साजरा करणे हा स्वातंत्र्य सैनिकांचा अपमान

### नक्षलवाद्यांच्या पत्रकाने खळबळ




**गडचिरोली** : स्वातंत्र्य संग्रामातून पळ काढत इंग्रजांची पाचवेळा माफी मागणाऱ्या सावरकरांचा जन्म दिन "गौरव दिवस' म्हणून साजरा करणे, हा स्वातंत्र्य सैनिकांचा अपमान असल्याची टीका नक्षल्यांनी पत्रकाच्या माध्यमातून केली आहे. भारतीय कम्युनिस्ट पाटीच्या (माओवादी) दंडकारण्य पश्चिम सब झोनल ब्यूरोचा प्रवक्ता श्रीनिवास याने हे पत्रक काढले आहे.

नक्षलवाद्यांनी काढलेले हे पत्रक समाज माध्यमावर सार्वत्रिक झाले आहे. यात त्यांनी म्हटले आहे की, मोदी जेव्हापासून सत्तेत आले. तेव्हापासून देशाचे भगवेकरण सुरू आहे. देशाच्या स्वातंर्त्य संग्रामात सुरवातीच्या काळात सावरकर सक्रिय होते. परंतु, इंग्रजांच्या तावडीत सापडल्यानंतर त्यांना अंदमानात काळ्यापाण्याची शिक्षा झाली. त्यानंतर त्यांनी आपली भूमिका बदलली. इंग्रजांची माफी मागून स्वतःची सुटका करून घेतली.

**देशातील बुद्धिवाद्यांनी विरोध करावा**

देशासोबत गद्दारी करणाऱ्या अशा व्यक्तींचा जन्मदिन एकनाथ शिंदे यांचे सरकार "गौरव दिवस' म्हणून साजरा करणार आहे. हा निर्णय खऱ्या स्वातंत्र्यविरांचा अपमान करणारा आहे. या निर्णयाचा देशातील बुद्धिवाद्यांनी विरोध करावा, असे आवाहन नक्षल्यांनी पत्रकाच्या माध्यमातून केले आहे.

एवढ्यावरच न थांबता हिंदू महासभा सारख्या संघटनेला पुढे करून "भारत छोडो' आंदोलनात इंग्रजांचे समर्थन केले. १९२३ ला लिहिलेल्या "हिंदुत्वे'पुस्तकात धर्माच्या आधारित देशाची संकल्पना मांडली. हिंदू, मुस्लिम द्वेष वाढविला. एकीकडे भगतसिंग, सुभाषचंद्र बोस सारख्या योद्धयांनी इंग्रजांविरोधात बंड पुकारत आपल्या प्राणाची आहुती दिली. तर दुसरीकडे सावरकर यांनी देशात द्वेष पसरवून इंग्रजांना साथ दिली.

## अखेर घरकुल घोटाळा आला उघडकीस

### पत्रपरिषदेत नगरसेवकांचा खुलासा : चौकशीत अनेक प्रताप चव्हाट्यावर

**अर्जुनी मोरगाव**: पंतप्रधान आवास योजनेतून स्थानिक नगरपंचायत क्षेत्रात तयार करण्यात आलेल्या घरकुलमध्ये घोटाळा झाल्याचे उघडकीस आले आहे. चौकशी अहवाल येताच यात लिप्त असलेल्यांचे धाबे दणाणले आहेत. बांधकामाचे अनेक नवनवीन किस्से चव्हाट्यावर आले आहेत. काही जागरुक नगरसेवकांनी पत्रपरिषदेत चौकशी अहवालाचे वाचन केले असल्याने आता दोषी कर्मचाऱ्यांवर काय कारवाई होते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

घरकुल घोटाळा या शिर्षकांतर्गत अनेक वृत्तपत्रानी १५ एप्रिल रोजी वृत्त प्रकाशित केले होते. सदर विषय विषय सुचिवर घेऊन सर्वसाधारण सभेत चर्चा करण्याच्या मागणीचे पत्र काही जागरुक नगरसेवकांनी नगराध्यक्षाना दिले होते. या वृत्ताची दखल घेत १८ एप्रिलच्या सर्वसाधारण सभेत जोरदार चर्चा झाली. यावर लेखा-पाल प्रफुल्ल गाडबैल, लिपिक सुमित मेश्राम व कंत्राटी कर्मचारी सुरेश बोरीकर यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली. या समितीने केलेल्या चौकशीचा अहवाल ४ मे च्या विशेष सभेत सादर करण्यात आला. यात मोठ्या प्रमाणावर अनियमितता असल्याचे सिद्ध झाले. दोर्षीवर काय कारवाई होणार? असा मुद्दा जागरुक नगरसेवकांनी उपस्थित केला. यावर मुख्याधिकारी शिल्पारानी जाधव यांनी कंत्राटी अभियंता दीपक डोंगरवार यांचेवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित केल्याचे सांगितले. या विशेष सभेत काही नगरसेवकांनी दोषींना समज देऊन सोडून देण्याचे सुचविले. मात्र, सभागृहाने ही सूचना फेटाळून लावली. त्यामुळे दोषींना पाठीशी घालणाऱ्या काही नगरसेवकांचे रहस्य गुलदस्त्यात आहे. या चौकशीत जुनेच घर दाखवून लाभ घेणारे ५, घरकुल ऐवजी गोदाम बांधकाम करणारे एक, एकाच कुटुंबात तिघांच्या नावे घरकुल मंजूर पण घर बांधकाम एकाच ठिकाणी असे ३, दोघांना घरकुल मंजूर पण एकाच ठिकाणी बांधकाम करणारे ६, बांधकाम सुरून करता पहिला हप्ता मिळालेले ६४, दोन हप्ते मिळालेले २, तिसरा व चौथा हप्ता मिळालेले प्रत्येकी एक तर एकही हप्ता न मिळालेले १८ लाभार्थी आढळून आले आहेत. घराचे बांधकाम पूर्ण पण छपाई (प्लॅस्टर) शिल्लक असलेले ३४, घराचे छत (स्लॅब) शिल्लक असलेले १० व केवळ पाया बांधकाम झालेले १७ लाभार्थी चौकशीत आढळले आहेत. रमाई घरकुल योजनेतही प्रचंड अनियमितता आहे. त्याचाही गौप्यस्फोट लवकरच केला जाणार असल्याचे पत्रपरिषदेत सांगण्यात आले.



### गरीबांना लुटणाऱ्यांना सोडणार नाही

**घरकुलाचे देयके काढण्यासाठी चिरीमिरी घेऊन जर गरीब जनतेची लुटमार होत असेल तर ते आम्ही कधीच सहन करणार नाही. माझ्या गरीब जनतेची लुटमार करणाऱ्या कर्माचाऱ्याना सोडणार नाही.**

**दानेश साखरे, नगरसेवक अर्जूनी मोरगाव**

**लाभार्थ्यांविषयी आक्षेप नाही**

पत्रपरिषदेत दानेश साखरे, सर्वेश भुतडा, अतुल बन्सोड, राधेश्याम भेंडारकर, बांधकाम सभापती सागर आरेकर, शिला उईके, दीक्षा शहारे, ममता भैय्या, दिव्या पशीने, इंदू लांजेवार हे नगरसेवक उपस्थित होते. लाभार्थ्यांविषयी अजिबात आमचा आक्षेप नाही. जो घोटाळा झाला त्यात अधिकारी, कर्मचारी सामील आहेत. मात्र या नगरसेवकांमुळे तुमचे नुकसान होईल, तुमच्याकडून वस-ुली केली जाईल असे चुकीचे संदेश पेरुन लाभार्थ्यांना भडकविण्याचे पाप काही नजीकचे विघ्नसंतोषी करत आहेत. नगरसेवकांना पैसे द्यावे लागतात म्हणून पैसे द्या असे काही कर्मचारी लाभार्थ्यांना सांगून वसुली करतात. लाभार्थ्यांच्या विरोधात आमचा कुठलाही उठाव नाही. मात्र, खरे गरजू लाभार्थी वंचित आहेत, लाभ धनदांडग्यानी घेतला. लाभार्थ्यांच्या केसालाही धक्का लागू नये. हा घोळ कर्मचाऱ्यांनी केला. वंचितांसाठी आमची लढाई असल्याचे नगरसेवकांनी सांगितले.

## केंद्रीय विद्यालयाला कधी मिळणार जागा

**■ पाच वर्षांपासून जागेचा प्रश्न रेंगाळलेलाच**

**■ तत्कालीन जिल्हाधिकारी काळेनंतर प्रकरण पुढे गेलेच नाही**

**गोंदिया** :- केंद्रसरकारच्या मानव संशाधन व मनुष्यबळ मंत्रालयाच्यावतीने देशातील १५० जिल्ह्यात केंद्रीय विद्यालय मंजूर केले असून महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्याचा सुध्दा यात समावेश आहे. या केंद्रीय विद्यालयात शासकीय नोकरदारापासून ते सर्वसामान्यांच्या मुलांना प्रवेश मिळणार आहे.

भंडारा येथील जवाहरनगर स्थित केंद्रीय विद्यालय प्रशासनाला गोंदिया येथे केंद्रिय विद्यालय सुरु करण्यासाठी १० एकर जागेचा शोध घेण्यासंदर्भात २०१७ मध्येच निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार त्यावेळच्या जवाहरनगर केंद्रीय विद्यालयाच्या प्राचार्यांनी पाठपुरावा सुध्दा केला मात्र त्याना यश आले नाही. शिक्षणाच्या क्षेत्रात नक्षलग्रस्त, आदिवासी जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यासाठी हे विद्यालय सेमीअर्बन म्हणून मंजुर झाले आहे. २०१७ नंतर आता २०२३ मध्ये जवाहरनगर येथील प्राचार्यांनी विद्यमान जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांची २८ एप्रिल रोजी भेट घेत जागा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात पत्र दिले आहे.

देशातल्या १५० जिल्ह्यामध्ये सध्याच्या घडीला केंद्रीय विद्यालय नव्हते अशा ठिकाणी हे विद्यालय मंजुर करण्यात आले आहे. यामध्ये गोंदियाचा समावेश सुध्दा आहे. आधीपासूनच केंद्रसरकारच्या अंतर्गत असलेले नवोदय विद्यालय हे नवेगावबांध येथे सुरु आहे. त्यातच आत्ता नवे केंद्रीय विद्यालय मिळाल्याने खेड्यापाड्यातीलच नव्हे तर आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना महागड्या सीबीएसईच्या शांळाऐवजी शासनाच्याच शाळेतून कमी पैशात सीबीएसईचे शिक्षण उपलब्ध होणार आहे.

गोंदिया येथे हे केंद्रीय विद्यालय सुरु करण्यासाठी भंडारा येथील जवाहरनगर केंद्रीय विद्यालयाच्या प्राचार्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली होती. त्यानुसार जवाहरनगर केंद्रीय विद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य महिपाल आणि त्यांच्या चमूने १९ जानेवारी २०१७ रोजी गोंदिया येथे येऊन तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ.अभिमन्यू काळे यांची भेट घेऊन केंद्रिय विद्यालय सुरु करण्यासंदर्भात चर्चा केली होती. तसेच विद्यालयासाठी गोंदिया शहराच्या परिसरात सुमारे १० एकर जागा हवी असल्याची माहिती दिली. या चर्चेमध्ये गोंदिया शहराच्या लगत शासकीय जागेचा त्वरीत शोध घेऊन अहवाल सादर करण्याबाबतचे निर्देशही तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी दिले होते. त्यानंतर मात्र पाच वर्षापर्यंत कुठलाच पाठपुरावा यासंदर्भात न झाल्याने आणि दोन वर्ष कोरोना काळात गेल्याने केंद्रिय विद्यालयाच्या जागेचा प्रश्न अधातंरीच राहीला. विशेष म्हणजे यासंदर्भात एकाही लोकप्रतिनिधीने प्रशासनाकडे पाठपुरावा केलेला नाही.

### केंद्रीय विद्यालयासाठी टीबी हॉस्पीटलची जागा पर्याय

**गोंदिया येथे नव्याने सुरु होणाऱ्या केंद्रीय विद्यालयासाठी १० एकर जा-गेची गरज आहे. एवढी मोठी जागा शासकीय सध्यातरी शहरानजीक कुठेच दिसून येत नसल्याने जुने टी.बी.हॉस्पीटलची जागा ही एक पर्यायी जागा होऊ शकते. शहराला लागून आणि सर्वसुविधाजनक ही जागा असल्याने जिल्हाप्रशासनाने ही जागा शिक्षणाचा दृष्टीकोन समोर ठेऊन उपलब्ध करुन देण्याची मागणी ओबीसी संघटनांनी आपल्या अनेक निवेदनातून शासनाकडे केली आहे.**

### शासकीय जागेचा शोध घेऊन जागा उपलब्ध करुन देऊ-जिल्हाधिकारी

**गोंदियातील केंद्रीय विद्यालयाच्या जागेसंदर्भात आपणास २८ एप्रिल रोजी जवाहरनगर येथील केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य भेटायला आले. त्यांनी जागेसंदर्भात पत्र दिले आहे. त्या पत्राच्या अनुषगांने शहरानजीक असलेल्या शासकीय, निमशासकीय व वनविभागाच्या जागेचा शोध त्वरीत घेऊन हा विषय मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार असल्याचे जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी सांगितले.**




### मानवसंधाशन मंत्रालय करणार नोकर भरती

**या केंद्रिय विद्यालयासाठी जो काही स्टाप लागणार आहे, त्या पद-ाची भरती मानव संशाधन व मनुष्यबळ मंत्रालयातर्गत येत असलेले केंद्रीय विद्यालय संघटन हे देशपातळीवर करणार आहे. सुरवातीला नजीकच्या केंद्रीय विद्यालयातील शिक्षक वर्ग प्रतिनियुक्तीवर पाठवून ही केद्रीय शाळा सुरु करण्याचा प्रयत्न केला जातो.**

### सुसज्ज व्यायामशाळे सोबतच प्रयोगशाळा

**नव्याने सुरु होणाऱ्या केंद्रीय विद्यालयामध्ये सर्व विद्यार्थ्यांसांठी सु-सज्ज अशी व्यायामशाळा राहणार आहे. सोबतच इयत्ता १ ते ५ पर्यंतसाठी एक, इयत्ता सहा ते १० वी पर्यंतसाठी एक आणि इयत्ता ११ ते १२ वी साठी एक अशा तीन स्वतंत्र संगणक प्रयोगशाळा राहणार आहेत. आरटीईमधील प्रवेश घेतलेल्या मुलांना निशुल्क शिक्षण मिळणार तर बीपीएलमधील मुलांना नाममात्र प्रवेश शुल्क लागणार आहे. सोबतच शासकीय कर्मचाऱ्यांच्या मुलांनाही नाममात्र शुल्क आकारण्यात येणार आहे.**

### महिला लोकशाही दिन १५ मे रोजी

**गोंदिया:** महिला व बाल विकास विभागाच्या वतीने जिल्हा स्तरावर दर महिन्याचा तिसरा सोमवार ङ्गमहिला लोकशाही दिनङ्घ म्हणून साजरा करण्यात येतो. महिलांच्या कोणत्याही विभागाशी संबंधीत समस्या, वैयक्तीक समस्या, गाऱ्हाणी, अडीअडचणी याबाबत महिला लोकशाही दिनात त्यांचे निवेदन स्विकारण्यात येतात अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौणिकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. सोमवार १५ मे २०२३ रोजी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले आहे.

## "माझी वसुंधरा"त पालिकेची घोडदौड

**गोंदिया:** दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. त्यावर मात करण्याकरिता शासनाने माझी वसुंधरा अभियान सुरु केले. वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धनाच्या माध्यमातून पर्यावरण संतुलीत ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या अभियानाला गोंदिया नगर पालिकेने साद दिली असून वृक्षसंवर्धनासह विविध उपक्रम राबविले. हे अभियान अधिक चांगल्याप्रकारे कसे राबविता येईल याकरिता पालिका प्रशासन कार्यरत असल्याचे मुख्याधिकारी करण चव्हाण यांनी सांगितले.


गेल्या काही वर्षात पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत चालला आहे. त्याचाच परिणाम वातावरणावर देखील होत आहे. तापमानात दिवसेंदिवस वाढ होत असून त्यामुळे पाूस देखील अनियमित झाला आहे. पर्यावरणाचे संतुलन कायम ठेण्याच्या उद्देशाने शास-नाने माझी वसुंधरा हे अभियान राबविणे सुरु केले. त्या माध्यमातून वृक्षलागवड आणि त्यांचे संवर्धन करत जमीनीची पत देखील सुधारण्याचा प्रयत्न होत आहे. हे अभियान गोंदिया नगर पालिकेने देखील हाती घेतले आहे. त्याकरिता विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. हे अभियान आणि या उपक्रमांच्या माध्यमातून गोंदियाची पर्यावरण पुरक शहराकडे वाटचाल सुरु आहे. शहराचे हरित अच्छादान वाढविण्याच्या दृष्टीने अभियान काळात सुमारे ५ हजार ३०४ वृक्षांची लागवड करण्यात आली असून त्याचे संगोपन करण्यात येत आहे. अमृत वने अंतर्गत १८ हरितक्षेत्र तयार करुन त्यामध्ये ४ हजार १८१९.२७ वर्ग मीटर क्षेत्रात १० हजार ८०४ झाडे लावण्यात आली असून त्यांचे संगोपन करण्यात येत आहे. शहरातील मोकळ्या जागेमध्ये २ बागा विकसीत करण्यात आल्या आ-हेत. रस्त्याच्या दुतर्फा आणि रस्ता दुभाजकांवर झाडे लावण्यात आली असून त्याचे संगोपन करण्यात येत आहे. इलेक्ट्रीक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांमध्ये कार्यक्रम घेऊन जागरुकता करण्यात येत आहे. इलेक्ट्रीक वाहनांना प्रोत्सा-हन देण्यासाठी शहरात १ चार्जिंग पॉईंट सुरु केला आहे. प्रदुषण कमी करण्यासाठी नगर परिषदेत प्रत्येक सोमवार हा नो व्हेईकल डे म्हणून पाळला जातो. सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्यास नागरिक, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक यांनी भरघोष प्रतिसाद दिला. नियमित सायकल वापर करणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचे माझी वसुंधरा टी शर्ट चे वाटप करुन सत्कार करण्यात आला. जलसंधारण करिता नगर परिषद कार्यालय तसेच नगरपरिषदेच्या शाळेमध्ये रेन वाटर हार्वेस्टिंग आणि रेन वाटर परकोलेशनची व्यवस्था करण्यात आली आहे. नगर परिषदतर्फे बांधकाम परव-ानगी देताना रेन वाटर हार्वेस्टिंग बंधनकारक करण्यात आले आहे. माझी वसुंधरा अभियानाच्या प्रचार प्रसिद्धीसाठी विविध स्पर्धांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

### अपारंपरिक उर्जेचा वापर

**नगर परिषद गोंदियामध्ये १० किलो वॅटचे ऑनग्रीड आणि १० किलो वॅटचे ऑफग्रीड सोलर पॅनल कार्यरत असून त्यापासून कार्यालयाची मोठ्या प्रमाणात विजेची गरज भागविली जाते. तसेच शहरात ५ सोलर हायमास्ट लावण्याचे काम सुरु आहे.**

**पर्यावरण संतुलित राहून त्यामाध्यमातून पर्यावरणाचा समतोल कायम ठेवण्याच्या उद्देशाने शहरात माझी वसुंधरा या मोहिमेंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. पुढेही राबविण्यात येणार आहेत. कोरोना संक्रमण काळात काही काळ कामाची गती मंदावली होती. आता मात्र पुन्हा हे अभियान सुरु करण्यात आले आहे.**

**करण चव्हाण, मुख्याधिकारी गोंदिया**




## विषयनिहाय आरक्षणाने एससीच्या तुलनेत भटक्या, ओबीसींच्या जागा अधिक रिक्त

### राज्य मागासवर्गीय आयोगाच्या उपसमितीचा प्राध्यापक भरतीचा अहवाल राज्यपलांना सादर

**संभाजीनगर:** राज्यातील १० अकृषी विद्यापीठे सन १९७७ महाविद्यालयांत तब्बल १०,२१३ पदे ओबीसी म्हणजेच इतर मागासवर्गीयांची आहेत? खुल्या प्रवर्गाची १४४६ पदे भरलेली नाहीत. अनुसूचित जाती म्हणजेच एससीच्या १८०७ मंजूर पदांपैकी ११८ पदे रिक्त असल्याचा निष्कर्ष महाराष्ट्र राज्य मागासगर्वीय आयोगाने काढला. आयोगाने त्यांच्या उपसमितीचा हा अहवाल २ मे रोजी कुलपती रमेश बैस यांना सादर केला. रिक्त जागा भरताना एससी आणि खुल्या प्रवर्गाच्या तुलनेत भटक्या अन ओबीसी प्रवर्गाच्या जागा अधिक रिक्त राहिल्याचेही आयोगाने म्हटले आहे.

राज्य सरकारने एम.जी.गायकवाड यांच्यानंतर न्यायमुर्ती आनंद निरगुडे यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा दुसरा राज्य मागासवर्ग आयोग स्थापला होता. यात उस्मानाबाद येथील प्राध्यापक डॉ. गोविंद काळे, डॉ. नीलिमा लखाडे यांचाही समावेश आहे. आयोगाने या दोन्ही सदस्यांचा समावेश करुन उच्च शिक्षण क्षेत्रा-तील गॅप शोधून काढण्यासाठी एका उपसमितीचे गठन केले होते. या समितीने क्षेत्रीय भेटी देऊन अन् तथ्य संकलनासह फायंडिंग काढले आहेत. याचा तीन पानी अहवाल २० एप्रिलला डॉ. काळे, डॉ. लखाडे यांनी आयोगाच्या अध्यक्षांना सादर केला. या अहवालात अध्यापकांच्या रिक्त जागांचा तपशील मांडण्यात आला आहे.

**राज्यात १०,२१३ अध्यापकांची पदे भण्याची शिफारस**

| प्रवर्ग | एससी | एसटी | व्हीजे-ए | एनटी-बी | एनटी-सी | एनटी-डी | एसबीसी | ओबीसी | ईडब्ल्यूएस | ओपन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | १८०७ | ९१३ | ४३७ | ३४७ | ४७२ | २९४ | २५२ | २५३८ | ८९७ | ६०२१ |
| भरलेली पदे | १६८९ | ३२५ | २०४ | १३७ | १७४ | ११३ | ५६ | ८१९ | ११ | ४५७५ |
| रिक्त पदे | ११८ | ५८८ | २३३ | २१० | २९८ | १८१ | १९५ | १०१९ | ८८६ | १४४६ |

### ११७७ महाविद्यालयांत फक्त २४,२२६ अध्यापक कार्यरत

**उपसमितीने १ ऑक्टोबर २०१७ नुसारची विद्यार्थी संख्या गृहीत धरुन प्राध्यापक-विद्यार्थी संख्येचा ताळेबंद मांडला आहे. २०१७ च्या विद्यार्थी संख्येनुसार राज्यात ३४,४३९ अध्यापकांची पदे मंजूर आहेत. त्यापैकी १३ अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित ११७७ महाविद्यालयांमध्ये फक्त २४,२२६ अध्यापक कार्यरत आहेत. याचाच अर्थ असा की, १०,२१३ प्राध्यापकांची वानवा आहे. ही पदे तातडीने भरली जा-वीत असे आयोगाच्या सदस्यांना वाटते आहे. उपसमितीने ५३२ पैकी ५२३ महाविद्यालयांच्या २०८८ मंजूर पद भरतीसंदर्भात विद्यापीठाच्या आरक्षण कक्षाकडून बिंदूनामावली तपासली आहे. त्याप्रमाणे हा अह-वाल तयार केला आहे.**

### अनुसूचित जाती, खुल्या प्रवर्गाला झुकेत माप

**१४ ऑगस्ट २०१५ रोजीच्या शासननिर्णयानुसार विषयनिहाय आरक्षण लागू केले होते. त्यामुळे पदभरती करताना खुल्या प्रवर्ग आणि अनुसूचित जातीची रिक्त पदे प्राधान्याने भरल्याचे निदर्शनास आले आहे. ३२५ कॉलेजांचे बिंदू तपासल्यानंतर उपसमितीने हा निष्कर्ष काढला आहे. यामुळे विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब.क.ड.) विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांना अध्यापक म्हणून संधी मिळत नसल्याचेही उपसमितीचे मत आहे. मावक अर्थात मागासवर्गीय कक्षाच्या बिंदूनामावली तपासणीअंती खुले आणि एससी वगळता इतर जातींची ६८ ते ९८.२० टक्के पदे रिक्त असल्याचे दिसते आहे. पदभरतीत वंचित समूहावर अन्याय झालेला दिसतो आहे. त्यामुळे ही पदे तातडीने भरली जावीत. असेही डॉ. गोविंद काळे आणि डॉ. नीलिमा लखाडे यांनी त्यांच्या अहवालात म्हटले आहे.**

## संपादकीय

# ओबीसी जनगणनेचे हत्यार!

राहुल गांधी, बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि इतर अनेक राजकारणी ओबीसी जनगणना करण्यास आग्रही आहेत. जातजनगणनेतून समोर येणा?्या आकडेवारीच्या आधारे प्रादेशिक पक्ष आपापल्या मतपेढी मजबूत करण्यासाठी आरक्षणाची मागणी करू शकतात. याचा थेट फटका भाजपला बसू शकण्याची शक्यता वर्तवली जाते. कर्नाटक, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान निवडणुकांमध्ये हा मुद्दा महत्त्वाचा ठरू शकतो.

राष्ट्रीय जनता दल आणि संयुक्त जनता दलाने मात्र भाजपचा विरोध मोडीत काढून बिहारमध्ये जातनिहाय जनगणना सुरू केली आहे. ङ्गमोदीफ या आडनावावरून राहुल गांधी यांना इतर मागासांचा विरोधक ठरवून भाजपने आणखी घेरण्याची तयारी केली आहे. दुसरीकडे, कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत प्रचार करत असताना मागासवर्गीयांच्या जनगणनेवरून भाजपला घेरले आहे. २०१९ मध्ये राहुल यांनी कर्नाटकमधील कोलारमध्ये केलेल्या भाषणामुळे लोकसभेचे सदस्यत्व गमावले आहे. त्याच कोलारमध्ये राहुल यांनी एका रॅलीत जातजनगणनेची मागणी उचलून धरली. भाजप ओबीसी, एससी आणि एसटीची मते घेते; परंतु त्यांची गणना करू शकत नाही, अशी टीका त्यांनी केली. राहुल यांच्या वक्तव्यानंतर काँग्रेसने जातजनगणना हा चर्चेचा मुद्दा बनवण्यास सुरुवात केली आहे. पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून जातजनगणनेची मागणी केली आहे. काँग्रेस मुख्यालयात जयराम रमेश आणि कन्हैयाकुमार यांनी जातजनगणनेवर पत्रकार परिषद घेतली. या मुद्द्याच्या मदतीने राहुल आणि खर्गे काँग्रेसला संजीवनी देण्याचा प्रयत्न करत आहेत. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार, उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव आणि शरद पवार यांच्या भेटीनंतर राहुल आणि खर्गे जातनिहाय जनगणनेसाठी आवाज उठवत आहेत.

भारतात ब्रिटिश राजवटीत १८७२ मध्ये जनगणना सुरू झाली. १९३१ मध्ये ब्रिटिश शासकांनी शेवटची जातजनगणना केली होती. त्या वेळी भारतात सुमारे ४६०० जातींची गणना झाली होती. त्यानंतर जातनिहाय जनगणना झाली नाही. २०११ मध्ये प्रादेशिक मित्रपक्षांच्या मागणीनंतर काँग्रेस सरकारने जातनिहाय जनगणनेला हिरवा कंदील दिला. मात्र आकडेवारी जाहीर होण्यापूर्वीच काँग्रेसचे सरकार बदलले. नंतर मोदी सरकारने जातनिहाय जनगणनेची आकडेवारी जाहीर करण्यास नकार दिला. केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या प्रतिज्ञापत्रात २०११ च्या आकडेवारीत अनेक त्रुटी असल्याचे म्हटले आहे. या कारणास्तव ती आकडेवारी प्रसिद्ध झाली नाही. प्रशासनाला जातीची मोजणी करता येत नाही. याचे कारण जातीतील पोटजातींचे अस्तित्व हे आहे. जातजनगणनेची मागणी ४० वर्षे जुनी आहे. १९८० च्या दशकात प्रादेशिक पक्षांच्या उदयानंतर त्याची मागणी सुरू झाली. मंडल आयोगाच्या स्थापनेनंतर या मागणीला वेग आला. १९३१ मध्ये झालेल्या जातजनगणनेच्या आधारेच मंडल आयोगाने आपली शिफारस तयार केली. द्रमुक, राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पक्ष, संयुक्त जनता दल- सारखे पक्ष जातजनगणना करण्याबाबत आवाज उठवत आहेत. जातजनगणना केल्यास कल्याणकारी योजना राबवणे सोपे होईल, असे या पक्षांचे म्हणणे आहे. सरकारकडे योग्य आकडेवारी असल्यास योजनांची योग्य अंमलबजावणी करता येईल.

जातजनगणना करण्याच्या बाजूने दिलेला सर्वात मजबूत युक्तिवाद म्हणजे सामाजिक लोकशाही मजबूत करणे. जनगणनेच्या आकडेवारीवरूनच वंचित घटकांचा विकास शक्य असल्याचाही युक्तिवाद केला जात आहे. जातजनगणनेचा मुद्दा बिहारमधून पुढे आला. भाजपपासून फारकत घेतल्यानंतर नितीशकुमार यांनी जातनिहाय सर्वेक्षणाचे आदेश दिले. राष्ट्रीय स्तरावरही अशा सर्वेक्षणाची मागणी जोर धरू लागली आहे. काँग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, आप या राष्ट्रीय पक्षांनी जातनिहाय जनगणनेची मागणी केली आहे. दक्षिणेपासून उत्तरेपर्यंतच्या प्रादेशिक पक्षांनी यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. भाजपविरोधात काँग्रेस आणि अनेक विरोधी पक्ष एकत्र मोर्चेबांधणी करण्याच्या तयारीत आहेत. त्यांच्याकडे संपूर्ण देशासाठी मोठा आणि प्रभावी समान मुद्दा नाही. त्यामुळेच जात गणनेला महत्त्व दिले जात आहे. जातजनगणनेचा सर्वाधिक फायदा ओबीसींना मिळू शकतो. ओबीसी मतदार देशभर प्रभावी आहेत. बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश, तामिळनाडू आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये भाजपची प्रादेशिक पक्षांशी थेट स्पर्धा आहे. या राज्यांमध्ये स्थापन झालेल्या प्रादेशिक पक्षांचे राजकारण केवळ जातीवर आधारित आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी गमावलेला जनाधार परत मिळवण्यासाठी हे पक्ष जात गणनेला प्राधान्य देत आहेत.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर "सीएसडीएस' आणि "लोकनीती' या संस्थांनी एक सर्वेक्षण केले. त्यानुसार २०१९ मध्ये ४४ टक्के ओबीसींनी भाजपला मतदान केले. दहा टक्के ओबीसींनी भाजपसोबत युती करून पक्षाच्या बाजूने मतदान केले. १५ टक्के ओबीसींनी काँग्रेसच्या बाजूने मतदान केले तर काँग्रेसच्या मित्रपक्षांना ओबीसी समाजाचा केवळ सात टक्के पाठिंबा मिळाला. सर्वेक्षणानुसार बसपला ओबीसी समाजाची पाच टक्के मते मिळाली. ओबीसी मतदार सर्वाधिक प्रबळ असलेल्या मतदारसंघांमध्ये लोकसभेच्या २२५ जागा आहेत. २०१९ मध्ये भाजप आणि मित्रपक्षांनी यापैकी २०३ जागा जिंकल्या होत्या. सप-बसपला १५ तर काँग्रेसला उर्वरित सात जागा मिळाल्या. आधी सर्वोच्च न्यायालयात आणि नंतर संसदेत भाजपने जातजनगणना न करण्याची घोषणा केली आहे. केंद्र सरकारने सर्वसाधारण जनगणनेलाही स्थगिती दिली आहे. याचे कारणही जातजनगणना असल्याचे मानले जाते. २०२४ च्या निवडणुकीपूर्वी भाजपला कोणताही धोका पत्करायचा नाही. भाजप जातजनगणना करून १९९० मध्ये घडलेले राजकारण नव्याने अनुभवू इच्छित नाही. जातजनगणनेतून समोर येणाऱ्या आकडेवारीच्या आधारे प्रादेशिक पक्ष आपापली मतपेढी मजबूत करण्यासाठी आरक्षणाची मागणी करू शकतात. जातजनगणना झाल्यास प्रादेशिक पक्षांना संजीवनी मिळून भाजपला थेट फटका बसू शकतो. ङ्गसीएसडीएसफ्नुसार, २०१४ मध्ये संपूर्ण देशातील ३४ टक्के तर २०१९ मध्ये ४४ टक्के ओबीसींनी भाजपला मते दिल्याचा अंदाज आहे. याशिवाय दलित आणि आदिवासींची मतेही भाजपकडे गेली. जातजनगणना झाल्यास यात विभाजन होऊ शकते.

सरकारमध्ये असताना काँग्रेसनेही जातजनगणनेचा मुद्दा थंड्या बस्त्यात ठेवला होता. मात्र आता पक्षाने त्यावर आवाज उठवला आहे. अशा स्थितीत काँग्रेस प्रादेशिक पक्षांच्या या मुद्द्याला प्राधान्य का देत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. विधानसभा निवडणुकीत काँग्रेस या मुद्द्याचे भांडवल करण्याचा प्रयत्न करत आहे. कर्नाटक, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमध्ये हा प्रयोग यशस्वी झाल्यास २०२४ मध्ये काँग्रेस हा मोठा मुद्दा बनवेल. कर्नाटकनंतर मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. अहवालानुसार, मध्य प्रदेशमध्ये ४८ टक्के, राजस्थानमध्ये ५५ टक्के आणि ४८ टक्के ओबीसी मतदार आहेत. सध्या राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये काँग्रेसचे सरकार आहे. या तीन राज्यांमध्ये लोकसभेच्या ६५ जागा आहेत. "सीएसडीएस'च्या सर्वेक्षणानुसार २००९ मध्ये काँग्रेसला ओबीसींची २५ टक्के मते मिळाली होती. त्या वेळी लोकसभा निवडणुकीत पक्षाला २०६ जागा मिळाल्या होत्या. मात्र २०१४ आणि २०१९ मध्ये ओबीसींच्या मतांमध्ये लक्षणीय घट झाली. २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसला ओबीसी समाजाची सुमारे १५ टक्के मते मिळाली होती. म्हणजेच २००९ च्या तुलनेत दहा टक्क्यांनी घट झाली. मतसंख्या घसरल्याने काँग्रेसला बऱ्याच जागांचा फटका बसला. २०१५ मध्ये काँग्रेसला ४४ तर २०१९ मध्ये फक्त ५२ जागा मिळाल्या.

२०११ मध्ये जनगणनेसोबतच काँग्रेसच्या डॉ. मनमोहन सिंग सरकारने जातींचीही मोजणी करण्याची घोषणा केली होती. त्या वेळी काँग्रेसने या घोषणेचा बराच फायदा करून घेतला होता. पण पक्षाला फारसा फायदा झाला नाही. २०१३ मध्ये कर्नाटकमध्ये काँग्रेसचे सरकार आल्यानंतर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राज्यात जात सर्वेक्षणाचे आदेश दिले. संपूर्ण राज्यात जातींची मोजणीही झाली. मात्र आकडेवारी जाहीर होऊ शकली नाही. २०१८ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला. स्वबळावर सरकार स्थापन करण्यात काँग्रेस यशस्वी झाली नाही. अशा स्थितीत काँग्रेस पुन्हा यावर का आवाज उठवत आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. काँग्रेसची (मुस्लीम, ब्राह्मण आणि दलित) बेस व्होट बँक आता अनेक राज्यांमध्ये बदलली आहे. त्याची भरपाई करण्यासाठी पक्षाने ओबीसींना जवळ करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. बिहार, झारखंडसह अनेक राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांची मते काँग्रेसकडे हस्तांतरित होऊ शकतात. त्यामुळे काँग्रेस हा मुद्दा लावून धरत आहे. "व्होट बँक शिफ्टिंग' हा काँग्रेससाठी मोठा मुद्दा बनला आहे. पण यामुळेच अनेक राज्यांमधील प्रादेशिक पक्ष काँग्रेससोबत युती करू इच्छित नाहीत.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# दीनमित्रकार मुकुंदराव पाटील

म.जोतीराव फुले यांनी इ.स.१८७३ साली पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाने महाराष्ट्रात इतिहास घडविला. बहुजन समाजातील शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतीक व राजकीय दृष्ट्या क्रांती घडवून आणण्यासाठी सत्यशोधक समाजाचे योगदान प्रथम आहे. म.फुलेंचे सहकारी कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, स्वामी रामय्या अभ्यावारु, डॉ. विश्राम रामजी घोले, धोंडीराम कुंभार, ज्ञानजिरीबुवा इत्यादी ज्ञात-अज्ञात कार्यकर्त्यांनी सत्यशोधक चळवळ वाढविली. काही काळ चळवळ मंदावली पुन्हा १९१० च्या दरम्यान दुसऱ्या पिढीतील कार्यकर्त्यांनी ही चळवळ जोमाने वाढविली. त्यामध्ये मुकुंदराव पाटील हे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. २३ नोव्हेंबर १९१० रोजी त्यांनी दीनमित्र साप्ताहिक वृत्तपत्र सुरु केले. तब्बल ५६ वर्षे त्यांनी हे पत्र चालविले.म्हणूनच मुकुंदराव पाटील यांना भारतीय ग्रामीण पत्रकारितेचे जनक म्हटले जाते.

मुकुंदराव पाटील यांचा जन्म २३ डिसेंबर १८८५ रोजी भांबुर्डे आजचे पुण्यातील शिवाजी नगर येथे झाला. सत्यशोधक कृष्णराव भालेकर हे मुकुंदरावांचे जनक वडील होत. भालेकरांच्या तरवडी ता.नेवारा येथील भगिनी काशीबाई सखाराम क्षीरसागर (पाटील) यांचा मुलगा गणपत सखाराम पाटील यांना अपत्य नसल्याने त्यांच्या निधनानंतर वयाच्या सातव्या वर्षी दत्तक घेण्यात आले. त्यामुळे भालेकरांचे पाटील झाले. क्षीरसागर घराच्याकडे पाटीलकी असल्याने त्या घराण्याला पाटील या नावानेच ओळखले जात असे. मुकुंदरावांचे जनक वडील भालेकर यांनी दीनबंधू हे पहिले सत्यशोधक वृत्तपत्र सुरु केले. त्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांचा कैवारी, दीनमित्र, अंबालहरी हे पत्रे सुरु `कली. इ.स.१८७७ मध्ये भालेकरी सुरु केलेल्या दीनमित्र मासिकाचे गणपतराव पाटील संपादक होते. परंतु लवकरच गणपतराव पाटील यांचे निधन झाले.

भालेकरांनी मृत्यूसमयी मुकुंदरावाजवळ अंतीम इच्छा व्यक्त करताना म्हटले की, माझी एकच इच्छा आहे की तू दीनमित्र पत्र निदान १२ वर्षे चालविले पाहिजे. जनकपित्याची अंतिम इच्छा मुकुंदरावांनी ५६ वर्षे दीनमित्र साप्ताहिक चालवून पूर्ण केली. दीनमित्राचा उद्देश व धोरण स्पष्ट करताना मुकुंदराव म्हणतात यात मुख्यत: शेतकरी आणि कारगीदारी लोकांच्या धार्मिक व सामाजिक स्थितीसंबंधाने विशेष चर्चा होत जाईल. स्वार्थी व निर्दय लोकांनी धर्माच्या शुद्ध ततत ढवळाढवळ करुन इतर हिंदू लोकांचा मनुष्यपणा पायाखाली तुडवीत आणला आहे. तो त्यांना पुन प्राप्त करुन देण्यासाठी दीनमित्राच्या प्रत्येक अंकाच्या मुखपुष्ठावर पुढील अभंग घायला जात असे

ज्याशी दु:खांनी गांजिली!तेचि सोथरेआपुले
ठेवी मुक्तीला गहान,काठि तयाकरिता ऋण
ऐसा दीनांचा कैवारी, दीना मानी देवापरी
तोचि साधू सत्पात्र, म्हणा तथा दीनमित्र



**सतीश जामोदकर**
**हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८**

हे व्रत दीनमित्रने अखेरपर्यंत पाळले.

मुकुंदराव पाटील यांनी सत्यशोधक समाजाचा प्रसार करण्यासाठी विविध वाड्मय प्रकारातून लेखन केलं. त्यांनी कुलकर्णी लिलामृत्र, शेटजी प्रताप आणि देशभक्त लिलासार या खंडकाव्यातून सत्यशोधकी विचार व्यक्त केला. कुलकर्णी लीलामृत मराठी भाषेतील पहिले विडंबन काव्य होय. हे काव्य दीनमित्रातून प्रकशित होत असताना नगरच्या कलेक्टरने त्यांच्या प्रेसवर बंदी आणून त्यांना ६७५ रू.चा दंड केला. ही दंडाची रक्कम छत्रपती शाहू महाराजांनी भरली. मुकुंदराव पाटील यांनी होळीची पोळी, चंद्रलोकाची विलक्षण रूढी, ढढ्ढाशास्त्री परात्रे,तोबातोबा, राष्ट्रीय तारूण्य या पाच काबंबऱ्या दीनमित्रातून प्रकाशित केल्या. राक्षसगण, हेडमिस्ट्रेस ही दोन नाटके, पतीचा पाठलाग ही चित्रपट कथा, हिंदू आणि ब्राम्हण, विठोबाची शिकवण हे ग्रंथ दीनमित्रातून लेखरुपाने प्रकाशित केले.

दीनमित्र इ.स.१९१० ते १९१९ सोमठाणे ता.पाथर्डी जि.अ.नगर आणि २५ फेब्रुवारी १९२० ते १९६७ या काळात तरवडी ता.नेतासा,जि.अ.नगर या लहानशा खेड्यातून प्रकशित झाला. या गावी जाण्यासाठी साधी सडक ही नव्हती. ५००-६०० लोकसंख्या असलेल्या या खेड्यात संपादक, कंपोझिटर, प्रिंटर, व्यवस्थापक भूमिका पार पाडून दीनमित्र चालविणाऱ्या मुकुंदराव पाटलांचे कौतूक प्रबोधनकार ठाकरे यांनी केले. १९९४ नंतर ब्राम्हणेत्तर पक्षातील केशवराव जेधे प्रभुती काँग्रेसमार्गी लागल्या. परंतु मुकुंदराव आपल्या सत्यशोधकी तत्वनिष्ठेवर अटळ राहिले. त्यांनी सत्यशोधनापासून फारकत घेतली नाही. व राजकारनातही गेले नाही. दीनमित्रातील अग्रलेखांनी भलेभल्यांना हादरवले. राष्ट्रसंतु तुकडोजी महाराज त्यांना गुरु मानीत होते. यशवंतराव चव्हाण, आचार्य अत्रे, शंकरराव मोरे, पंढरीनाथ पाटील इत्यादी मोठी माणसे त्यांच्या भेटीसाठी तरवडीला जात होती.

मुकुंदराव पाटील यांनी वऱ्हाड (१९२०), मुंबई (१९३०), कोल्हापूर (१९५०), सत्यशोधक परिषदांचे अध्यक्षपद भूषविले. १९२३ साली अकोट येथे झालेल्या माळी परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते. त्याचवेळी ब्राम्हणेत्तर समाजाच्यावतीने त्यांना मानपत्र ही देण्यात आले होते. त्यावेळी सोबत सत्यशोधक मोतीराव तुकाराम वानखेडे (करजगांव) होते. १९२४ मध्ये त्यांना रावसाहेब पदवी मिगळाली. अशा भारतीय ग्रामीण पत्रकारितेचे जनक ठरलेल्या मुकुंदराव पाटील यांची ४ डिसेंबर १९६७ ला प्राणज्योत मालवली. त्यांना स्मृतीदिन ग्रामीण पत्रकारिता म्हणून पाळला जावा असे वाटते.

# तत्वज्ञान आणि राजकारणाची बाजू, अन् फसलेली शेतकरी अवस्था!

आंदोलनाच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी जे स्व. शरद जोशी साहेबांनी तत्त्वज्ञान , धोरणे व विचारसरणी मांडली, ती आज तरी जगाच्या पाठीवर न विसरणारी किमया आहे. परंतु ही किमया साध्य करण्यासाठी राजकारणाची जोड हवी आहे. कारण शेतकऱ्यांची आर्थिक धोरणे हे संसद मध्ये कायद्याच्या चाकोरीत फसलेली आहे, आणि ती चाकोरी तोडण्यासाठी राजकीय क्षेत्राची गरज आहे. कारण प्रत्येक व्यवस्थेचा मूलभूत अधिकार जरी जनतेला दिला असेल तरी, कायदे दुरुस्त करणे ही बाब आमदार खासदारां वर आधारीत आहे.

ती बाब जनतेच्या लक्षात येण्यासाठी बराच काळ जात असतो. शेतकऱ्यांची आर्थिक समस्या, त्यांना लूटलेली व्यवस्था आणि त्यांच्यावर होत असलेलं अधिराज्य ही बाब सामान्य माणसाच्या कल्पनेच्या पलीकडील आहे. या देशात शेतकऱ्यांना व मजुरांना लुटणारे कायदे आहेत, हे शेतकऱ्याला जर माहित असते व या देशाचा आर्थिक धोरण त्याला समजलं असतं तर त्यांनी शेती कशाला केली असती? आणि त्याला ते समजू नये यासाठी तर जास्तीत जास्त धार्मिक व्यवस्थेत गुंतवल्या जात आहे. शेतकऱ्यांचे शोषण होऊन या देशात औद्योगिक क्रांती व्हावी हे तर मुळात धोरणच राबविले जात आहे. आणि ती बाब आजच्या राजकीय पक्षांना काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, बीजेपी यांना ती तोडायची नाही. ही अशीच चालत असलेल्या व्यवस्थेवर तर त्यांना राज्य करायचे आहे.

नुसतं छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत तुकाराम महाराज यांची नाव घेऊनच बोंबा ठोकायचे असून, राज्य करायचे



आहे. आणि हा संपूर्ण समाज भीम जयंती, शिवजयंती, रामनवमी, हनुमान जयंती, भागवत सप्ताह, अशा अनेक धार्मिक क्षेत्रात गुंतून ठेवायचा आहे. मग शेतकरी सुखी करणे शेतकऱ्यांची बाजू उचलणे व शेतकऱ्यांना न्याय देणे ही बाब साधारण आजच्या राजकारणात दुरापास्त दिसत आहे.

चिखलफेक करुन घाणेरडे कपडे घालण्यापेक्षा, राजकारणाची व्यवस्था, तत्त्वज्ञाना प्रमाणे स्वच्छ करणे ही बाब अतिशय गंभीर आहे, पण ते काही फार कठीण सुद्धा नाही. जनतेनी आणि निवडून आलेल्या नेत्यांनी जर या बाबीची पूर्तता केली तर ते शक्य सुद्धा होऊ शकते. ज्यां महापुरुषांनी तत्वज्ञानाचे धडे मांडले ते समाज सुधारक म्हणून गणल्या गेलेत. ते राजकारणात अपयशी झालेत. तत्त्वज्ञान हे गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मांडल्या जाते, आणि राजकारण हे गुलामी स्वीकारण्यासाठी मांडल्या जाते. राजकारणाची भाषा सामान्य व्यक्तींना समजण्यासाठी अतिशय सोपी आणि सरळ असते. आणि तत्वज्ञानाची भाषा कठोर, गंभीर, संघर्षवादी, आणि मनाला हेलकावे देणारी असते. मात्र राजकारण करताना फवारे उडविले जाते, तत्त्वज्ञानात मात्र ध्येयनिष्ठा असते. आणि ती ध्येयनिष्ठा साकार होण्यासाठी बराच काळ, वाट पाहावी लागेलं. देशपातळीवर राज्य पातळीवर, ज्या घोषणा होतात, ते फक्त समाजात सोडलेले फुगे असतात. कारण तत्त्वज्ञान समजून घेणारी देशात, राज्यात, शहरात, आणि गावात माणसे किती असू शकतात? बुद्धीच्या माध्यमातून, तत्त्वज्ञान समजून घेताना लोकसंख्येचा आणि मतदारांचा विचार केला तर, तत्त्वज्ञान समजून घेणारी माणसं एक टक्का सुद्धा नाहीत . मग राजकारण एक टक्का लोकांच्या भरोशावर होणार काय? मग सत्ता हातात कशी येईल, हा राजकीय पक्षांचा प्रश्न असतो. म्हणून काही योजना राबविल्या जातात, काही साकार होतात आणि काही योजनांचे फक्त फटाके फुटतात. काहीच योजना ह्या समाजाच्या उपयोगी अस्तित्वात येण्यासारखे असतात. राजकारण करण्या साठी सर्व व्यापक विचाराची घडामोड असावी लागते, केवळ तत्त्वज्ञान घेऊन राजकारण करणे आजच्या परिस्थितीत दूरापास्त आहे. फक्त जातीच्या भरोशावर केलेले राजकारण थोडेफार राजकारणाच्या दिशेने वाटचाल करीत आहेत ते फक्त समाजात फवारे उडविणे आहे. कारण या देशातील आर्थिक धोरणाची बाजू ही सामान्य माणसाला कळत नाही, त्यामुळे ही विसंगती आहे.

तेलंगणा राज्य सरकार सुद्धा काही अंशी फवारे उडवत असेल, तर त्यात नवल काहीच नाही. प्रत्येकच राज्यात थोड्याफार चुका असू शकतात.सर्व यंत्रणा शेवटच्या क्षणापर्यंत राबविणे ही फार कठीण बाब आहे. त्यासाठी पूर्ण मंत्रिमंडळ आणि योजना राबविणारे अधिकारी त्या व्यवस्थेसी प्रामाणिक असायला पाहिजे. तेव्हाच ती पूर्तता होते. कोणतेही राज्याचा एक मुख्यमंत्री या विशाल महाकाय व्यवस्थेत कुठे ना कुठे कमी पडतो. त्यासाठीच तर योजना राबविणारी व्यवस्था कार्यशील असणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायचे असेल तर नुसतं तत्त्वज्ञान मांडून आतापर्यंत चाळीस वर्षात सोडवल्या गेले नाहीत, तर कृतीतून दबाव तयार करावा लागला, त्याचा हा परिणाम आहे. आणि कोणताही दबाव हा कायम टिकवला जात नाही. कायम दबाव टिकून राहण्यासाठी राजकारणाची जोड लागते आणि राजकारणासाठी काही अंशी तरी खर खोटं योजना राबवून राजकारणात जिंकण्याची ती तयारी असते. तीच आजची पद्धत आहे. शंभर टक्के तत्त्वज्ञान उगाडून सध्या तरी राजकारण होत नाही, कारण त्यासाठी तेवढी साक्षरता हवी आहे .

तरीपण या व्यवस्थेत ८० टक्के प्रामाणिक पणा असावा ही जनतेची इच्छा असते. शेतकरी प्रश्न सोडविणे ही आता राजकीय बाब बनली आहे. आणि त्यासाठी शेतकरी विचार सोडवनाऱ्या पक्षाची जशी वाट मिळत असेल, त्या वाटेने सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांनी जाणे हे गरजेचं आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, बीजेपी व आंध्रातील चंद्राबाबू नायडू सरकार यांच्याशी संघर्ष करुन तेलंगणा मॉडेल के.चंद्रशेखरराव यांनी नवीन राज्य तयार केले. ते कदाचित काही अंशी यशस्वी असेल, काही अंशी ते कमी सुद्धा पडले असतील, तर तो प्रत्येकाच्या राजनीतीचा भाग आहे.

आजच्या परिस्थितीत राजनीति करुन शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंर्त्य मिळवण्यासाठी, संसद मध्ये पोहोचण्यासाठी, काही तत्त्वज्ञान मांडून व काही फुगारे सोडूनच राजनीति होत आहे. तत्त्वज्ञानाचा गाभा समजून मतदान करणारी मंडळी तयार होण्यासाठी अजून बराच काळ शिल्लक आहे, अन् त्यासाठी के. चंद्रशेखर राव यांचा भारत राष्ट्र समिती पक्ष जर शेतकरी समस्या घेऊन, व योग्य मांडणी असेल अन समाजासमोर येत असेल तर शेतकऱ्यांनी विचार करायला काही हरकत नाही! कारण योग्य तत्त्वज्ञान, व देशातील आर्थिक धोरणे समजून घेणारी, जनता अजून तरी पूर्णपणे साक्षर नाही. ज्या काँग्रेस पक्षांनी गरिबी वाढवली त्यांनीच निवडणुका जिंकासाठी गरीबी हटाविण्याचे फुगारे सोडले. मात्र गरीबी हटविली गेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. आता तत्त्वज्ञान सांगून समाज प्रबोधनकार व्हाय चे, की राजनीति च्या माध्यमातून सत्ताधीश होऊन शेतकरी प्रश्न सोडवायचे, या गंभीर बाबीवर नक्कीच विचार करावा लागेल . शासनाच्या व कायद्याच्या नजरेत शेतमालाला भाव मागणारा शेतकरी आता पुढे गुन्हेगार होऊ नये व त्याची बिकट अवस्था होऊ नये, त्यासाठी योग्य पद्धतीचे आमदार, खासदार जनतेला निवडून द्यावी लागतील, तरच या देशात समृद्धी नांदेल व योग्य दिशेने वाटचाल होईल. एवढीच अपेक्षा...

जय हिंद, जय बळीराजा, जय गुरु.

आपला नम्र -

**श्री धनंजय पाटील काकडे**
**९८ ९० ३६ ८०५८. ऊँ.०७-०५-२०२३.**
**अध्यक्ष - शेतकरी, वारकरी कष्टकरी महासंघ. मु.- वडूरा, पोस्ट - शिराळा, तालुका- चांदूरबाजार, जिल्हा-अमरावती, महाराष्ट्र**

# ओबीसी केंद्रित राजकारणाची लाट!

वज्रमूठ सभेतील तोबा गर्दीने तुडुंब भरलेला परिसर बघून वज्रमूठ आवळण्यात सहभागी असलेले राजकीय पक्ष आणि नेते सुखावले असतील. महाराष्ट्रात एकामागून एक विविध ठिकाणी आयोजित विरोधी पक्षाची एकजूट मजबूत होत असल्याचे चित्र दिसत आहे. तर निगरगट्ट सत्ताधाऱ्यांच्या जनविरोधी धोरणांचा सामान्य माणूस भक्ष्य ठरत असल्याचे सभांना मिळणाऱ्या प्रतिसादातून स्पष्ट होत आहे. एकीकडे सामान्य माणसांना रोज भेडसावणाऱ्या समस्यांचा डोगर उत्तुंग होत असताना मायबाप सरकार मात्र विरोधी पक्षांच्या हात धुवून मागे लागून त्यांचा सरकार विरोधी आवाज मंद, बंद करण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहेत. ही बाब संवेदनशील माणसाच्या जिव्हारी लागणारी आहे. त्यामुळेच वज्रमूठ सभांचे सत्ताधाऱ्यांना हादरुन सोडणारे रुप दिसत आहे. प्रस्थापित सरकारविरोधी आक्रोश व्यक्त होत आहे. तरीही वज्रमूठ सभेतील विषयांची मांडणी पुरेशी वाटत नसल्याची खंत समाज माध्यमातून बिनदिक्कतपणे व्यक्त होताना दिसत आहे, याचा विचार यानंतर होणाऱ्या वज्रमूठ सभांमध्ये होईल अशी आशा करण्यास हरकत नाही. विशेषतः ओबीसी जनगणना आणि शेतकऱ्यांच्या बद्दलची भूमिका अधिक जोरकसपणे, स्पष्टपणे घेण्याची आवश्यकता ध्यानात घेतली पाहिजे.

ओबीसी आरक्षण, जातीनिहाय जनगणना याबद्दलचा राहूल गांधींचा व्हिडीओ समाजमाध्यमावर अतिशय लोकप्रिय होत आहे. ओबीसी जनगणना करण्यासाठी ओबीसी समाजाची मागणी काँग्रेसच्या शीर्षस्थ नेत्यांनी उचलून धरणे ही बाब ऐतिहासिक होय. ओबीसीची जागरुकता आणि ओबीसीची राजकारणात निर्णायक भूमिका त्यामुळे अधोरेखित होत आहे. किंबहुना ओबीसीकेंद्रित राजकारणाची मेढ अधिक भक्कम होत असल्याचे राहूल गांधींनी हेरले असले पाहिजे. आणि ही त्यांची (प्रामाणिक) भूमिका विद्यमान राजकीय बदलासाठी ट्रंफ कार्ड ठरु शकणारी आहे.

खरं म्हणजे राहूल गांधींनी जातवार जनगणनेबद्दल घेतलेली भूमिका काँग्रेससाठी संजीवनी ठरू शकेल पण महाराष्ट्रातील काँग्रेसजन राहुल गांधींसारखी या बाबतीत भूमिका का घेत नाही यावर रुष्ट समाजमाध्यमावरील समाजमन दुर्लक्षित करता येणार नाही. काँग्रेससह शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी ओबीसी शेतकरी मुद्यांवर प्रकाशझोत वाढविणे अगत्याचे झाले आहे. कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या प्रचार सभेतील राहूल गांधी यांच्या भाषणाचा अंश फार लोकप्रिय होत आहे. सरकारी धोरणावर बोलणे म्हणजे ओबीसीचा अपमान होतो अशा कंड्या पिकवून दिशाभूल करण्यासंदर्भात त्या चित्रफिती मध्ये ते म्हणतात, "सवाल यह है। किसकी कितनी आबादी हैं। हिंदुस्तान की सरकार की सेक्रेटरीएटमे दलित ओबीसी आदिवासी सिर्फ ७% आते है। मतलब हिंदुस्तान के सरकार की रिढ की हड्डी जो है, सेक्रेटरीएठ ऑफ गवर्नमेंट ऑफ इंडिया,उसमे ७% दलित ओबीसी आदिवासी आते हैं । हिंदुस्तान में ओबीसी कितने हैं? आदिवासी कितने हैं? दलित कितने हैं? कांग्रेस पार्टी ने २०११ मे कास्टसेंसस किया। पुरे देश के जातीयो का डाटा उसमे है। मोदीजी आप जो ओबीसी की बात करते हैं, उस डेटा को आप पब्लिक कर दिजीए। पता लग जाए, इसमें कितने ओबीसी, कितने आदिवासी, कितने दलित है? अगर सबको भागीदार बनाना है। सबको इस देश के प्रगति में शामिल करना है, तो यह तो मालूम होना चाहिए की कौन कितने हैं। तो कास्ट सेंसस का डाटा आप रिलीज किजीए। अगर आप यह नहीं करेंगे,तो आप ओबीसी का अपमान कर रहे हैं। आप देश को समझाईये की आपके सरकार में सिर्फ ७% सेक्रेटरीज ओबीसी दलित आदिवासी में से क्यूं आते हैं। एससी एसटी का कोटा है। उसको उसकी आबादी सिर्फ प्रपोरशन कर दिजीए और तिसरी बात रिजर्वेशन पर ५०% का काप लगा रखा है, उसको हटा दिजिए। फिर बात करतें हैं की ओबीसी का अपमान कौन कर रहा है?"

ओबीसी रीजर्वेशन, जातीय जनगणणा, ओबीसीची सचिवालयातील नगण्य संख्या, आरक्षणाची ५०% ची अट या संदर्भात अशाप्रकारे खुपदा बरीच चर्चा झाली. काँग्रेसच्या अमदानीत मंडल आयोग लागू झाला नाही, हे खरे आहे, पण आज राहूल गांधी जे बोलत आहे ते फार महत्त्वाचे ठरते, यापूर्वी काँग्रेसचे नेतृत्व ओबीसीबद्दल एवढे खुलेपणाने बोलल्याचे आढळत नाही. त्यामुळे राहुल गांधींची भूमिका ओबीसीकेंद्रित राजकारणाला नवे धुमारे फुटण्यास अनुकूल ठरणारी आहे. मजो ओबीसी की बात करेगा, वो देश पर राज करेगा...फ्हा नारा ओबीसी विरोधकांना धडकी भरणारा वाटत आहे. या देशात राहायचे असेल तर निमूटपणे राहा, नाहीतर पाकिस्तानात चालते व्हा, असं ओबीसीला म्हणण्याची कोणाचीही बिशाद नाही. त्यामुळे ओबीसीला आता गांभीर्याने घेतल्याविना चालणार नाही. सांप्रतचे भारतीय राजकारणाचा विचार करताना

आणखी एका दृष्टीने ओबीसीचा लढा समजून घेणे महत्त्वाचे ठरेल, तो म्हणजे मंडल विरुद्ध कमंडलची लढाई. आज देशात जी राजकीय शक्ति सत्तावान झालेली आहे, तिचा प्राण कमंडलात आहे. मंडलविरोधी कमंडलच्या पाशात, राममंदिर आंदोलन फुगवले, मुस्लिम द्वेष फुलवला, लोकांच्या धार्मिक भावनांना हात घालून मंडलचा लढा क्षीण करुन धर्मांध राजकीय शक्ती बलदंड होत गेली.आणि वर्तमानात बहुरुपी उच्चजातवर्गीय-भांडवल-धर्मांध-गुंडपुंड-धनवंत-राजकीय शक्ति लोकशाहीच्या बोकांडी बसलेली दिसत आहे. तिला पायबंद घालण्यासाठी मंडल आंदोलनाला झालेला विरोध, ओबीसी आंदोलनाचे महत्त्व समजून घ्यावे लागेल. त्यादृष्टीने ओबीसी आंदोलनास विश्वासात घेतल्याशिवाय सत्ताधारी पक्षाच्या विरोधात रण पेटविणे सोपे नाही.

हिंदु म्हणून हमेशा ओबीसी फक्त सैनिकासारखा वापरला जातो, गर्व से कहो हम शुद्र है म्हणू लागला, हाच शुद्र काल शेतकरी आंदोलनात उभा झाला. अनेक मंदिरातील पुजारी हटवून ओबीसी पुजारी नेमले जाणे, हेच तर कमंडलचे पोट फोडून मंडल बाहेर पडण्याचे द्योतक, अर्थात ओबीसी मुक्तीचा संग्राम होय. महाराष्ट्र, बिहार,उत्तरप्रदेश, ओडिशा, झारखंड, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, पंजाब, हरियाणा, राजस्थान, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, तमिळनाडू देशातील अशा प्रमुख राज्यांमध्ये ओबीसी राजकारण प्रभावी आहे. ओबीसीला लोकसंख्येच्या प्रमाणात हक्काचा वाटा मिळावा यास्तव विशेषकरून जातीनिहाय जनगणनेच्या मागणीने उचल खाल्ली असून ओबीसीची अस्वस्थता राजकीय प्रभाव पाडणारी ठरेल.

राहुल गांधी ओबीसीला सन्मान देण्याची जी अभिव्यक्ती करत आहेत तिला शह देणाऱ्यांना काटशह देण्यासाठी प्रादेशिक पक्ष-नेते, ओबीसी दलित आदिवासी अल्पसंख्यांक नेतृत्व, राजकीय पाठबळ एकवटून प्रस्थापित सत्तांध शक्तिचा पाडाव करता येईल.त्यासाठी देशभर प्रस्थापित सत्तेच्या विरोधात असलेल्या तमाम पक्षांची महाराष्ट्रासारखी वज्रमूठ आवळली पाहिजे.

**अनुज हुलके**

# जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नियोजनबध्द कृती आराखडा तयार करा-जिल्हाधिकारी

**गोंदिया :** जलयुक्त शिवार अभियान ही राज्याची महत्वाकांक्षी योजना आहे. या अभियानांतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या कामाला गती मिळावी यासाठी दुसऱ्या टप्प्याअंतर्गत पात्र गावांची निवड करुन नियोजनबध्द कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जलयुक्त शिवार अभियान २.०, जलशक्ती अभियान, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, अमृत सरोवर, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० आदी योजना राबविणाऱ्या यंत्रणांची संयुक्त बैठक जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

सभेला मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा मृद व जलसंधारण विभागाचे सदस्य सचिव अनंत जगताप, उपजिल्हाधिकारी (रोहयो) लिना फलके, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी हिंदुराव चव्हाण, जि.प.लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सत्यजित राऊत, भूजल सर्व्हेक्षण विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक सचिन खोडे, जि.प.गटविकास अधिकारी (नरेगा) डी.एस.लोहबरे, वन विभागाचे प्रतिनिधी, भारतीय जैन संघटनेचे गोंदिया जिल्हा अध्यक्ष हिरेन जैन, विभागीय समन्वयक नितीन राजवैद्य उपस्थित होते.

जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत पात्र गावांची निवड करुन जिल्ह्याचा कृती आराखडा तयार करावा. शेतीसाठी सिंचनाच्या सुविधा निर्माण करणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. जलयुक्त शिवारच्या दुसऱ्या टप्प्यात जास्तीत जास्त कामांना कृषि, जलसंपदा, वन, मनरेगा यांच्यासह अन्य संबंधित यंत्रणांनी सुरुवात करावी. एकात्मिक पध्दतीने ग्रामस्थ, शेतकरी तसेच सर्व संबंधीत विभागाच्या समन्वयाने नियोजनबध्द अंमलबजावणी करुन जलयुक्त शिवार कार्यक्रमांतर्गत विविध मृद व जलसंधारणाचे क्षेत्रीय उपचार, जुन्या जलस्त्रोतांचे बळकटीकरण, आवश्यकतेनुसार दुरुस्ती, गाळ काढणे इत्यादी कामे घेऊन त्यांची यशस्वी अंमलबजावणी करुन शेतीसाठी संरक्षीत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यात यावी. शासनाच्या धोरणानुसार जिल्ह्यातील १०० गावात जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्यात येणार आहे. त्यामुळे या गावांतील शेतकऱ्यांच्या जीवनात जलक्रांती होऊन शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे असे त्यांनी सांगितले.

अमृत सरोवर अंतर्गत जिल्ह्यातील ३० कामे प्रगतीप-थावर असून प्रलंबीत कामे येत्या १५ मे पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात यावे. गाळयुक्त धरण व गाळयुक्त शिवार अभियान अंतर्गत जास्तीत जास्त गाळ काढण्याचे नियोजन करुन पाणी साठा वाढविण्याची अंमलबजावणी युध्दस्तरावर करावी. जलशक्ती अभियानांतर्गत पावसाच्या पाण्याची साठवणूक करुन ठेवावी. मनरेगाची प्रलंबीत कामे सुरु करण्यात यावी अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी भारतीय जैन संघटना (गोंदिया जिल्हा) यांचेद्वारे संगणकीय सादरीकरणाद्वारे गाळमुक्त धरणाबाबत उपयुक्त अशी माहिती देण्यात आली.


# नवेगावबांध फाउंडेशनने खासदार सुनील मेंढेंना दाखविले काळे झेंडे

**गोंदिया:** जिल्ह्यातील पर्यटन स्थळ म्हणून ओळख असलेल्या नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानाची देखरेखीची जवाबदारी पार पाडणार्या नवेगावबांध फाउंडेशनच्या वतीने शनिवारला गोंदिया-भंडाराचे खासदार सुनील मेंढे हे नवेगावबांध येथे जलजिवन मिशन कामाच्या भूमिपूजनककरीता आले असता,काळे झेंडे दाखविण्यात आले. खासदार मेंढे यांच्या बांधकाम कंपनीने नवेगावबांध राष्ट्रीय उद्यानात केलेल्या गार्डनच्या कामाचे लोकार्पण न केल्याचा निषेध म्हणून नवेगावबांध फाउंडेशनच्या वतीने नवेगावबांध येथील आझाद चौकात काळे झेंडे दाखविण्यात आले.



या संदर्भात नवेगावबांध फाउंडेशनचे अध्यक्ष रामदास बोरकर यांनी सांगितले की नवे-गाव बांध पर्यटन संकुल स्थळी सन २००३-०४ या आर्थिक वर्षात गार्डन व कॉन्फरन्स हॉल करिता कोट्यावधीचा निधी प्राप्त झाला.सदर कामाचे कंत्राट भंडारा येथील सनी कन्स्ट्रक्शन ज्याचे मालक विद्यमान खासदार सुनील मेंढे हे आहेत. असोसिएट अश्फाक अहमद यांच्या मदतीने सदर काम करायचे होते. २००८-०९ या कालीवतीमध्ये काम करण्यात आले.सदर काम करतेवेळी त्या कामात बऱ्याच त्रुट्या आढळून आल्या होत्या. नवेगावबांध संघर्ष समितीच्या वतीने झालेल्या कामाचे लोकार्पण करा अन्यथा दोर्षीवर कारवाई करा एवढीच मागणी होती, आणि या मागणीला धरून नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान बचाव संघर्ष समितीचा अध्यक्ष या नात्याने लोकायुक्ताकडे दाद मागण्यात आले होते. यामध्ये लोकायुक्ताने जिल्ह्याचे तत्कालीन दोन जिल्हाधिकारी व राज्याचे मुख्यसचिव यांना दोषी ठरविले. त्यावेळी आपण सदर कामाचे लोकार्पण करा किंवा दोर्षीवर कारवाई करा एवढी मागणी ला-वून धरली आणी खासदार सुनील मेंढे यांची भंडारा येथील शासकीय विश्रामगृहात भेट घेतली व त्यांना त्या गार्डनची डागडूजी करुन त्याचे लोकार्पण करण्याची विनवणी केली होती. परंतु वर्षा मागून वर्ष लोटून ही नवेगाव बांध येथील त्या गार्डनचे व कॉन्फरन्स हॉलचे लोकार्पण न झाल्याने या गोष्टीचा निषेध म्हणून नवेगावबांध या ठिकाणी आज शनिवारला आझाद चौक नवेगावबांध येथे खासदार सुनील मेंढे हे जलजीवन मिशनच्या काम ाच्या भूमिपूजनासाठी आले असता आझाद चौक नवेगाव बांध या ठिकाणी त्यांना काळे झेंडे दाखवून त्यांचा निषेध करण्यात आले.

# न्यायालय आदेशाची अवहेलना करणाऱ्या माध्य.शिक्षणाधिकाऱ्याची खुर्ची व संगणक जप्त



**गोंदिया:** न्यायालयाच्या आदेशाला न जुमानता आपला कारभार सुरू ठेवणाऱ्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्याची खुर्ची व संगणक साहित्य जप्त करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. त्यानुसार ३ मे रोजी गोंदिया जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात ही कारवाई करण्यात आली. आमगाव तालुक्याच्या शिवणी येथील सेवानिवृत्त शिक्षक निलकंठ धानू-जी भुते यांच्या १५ वर्षाच्या सेवेचा कालावधी ग्राह्य धरुन त्याच्या वेतनापोटी त्यांना २० लाख रुपये देण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. परंतु न्यायालयाच्या आदेशाला न जुमानता माध्यमिक शिक्षणाधिकारी आपला मनमजी कारभार चालवित होते. शिक्षक निलकंठ भुते यांनी १९८४ ते १९८९ या काळात नॅशनल ज्युनियर कॉलेज परसवाडा येथे प्राध्यापक म्हणून सेवा दिली. त्यानंतर १९९१ ते १९९७ या काळात भुषणराव पाटील तिल्ली मोहगाव या शाळेत ते कार्यरत होते.

परंतु संस्थेच्या अंतर्गत कलहामुळे ती शाळा बंद पडली. परंतु शासनाने त्यांचे समायोजन केले नाही.त्यामुळे त्या शाळेतील सर्व शिक्षक उच्च न्यायालयात गेले होते. त्या प्रकरणाचा निकाल सन २०१२ मध्ये ला-गला. त्यांना सेवेत सामावून घेण्याचा आदेश न्यायालयाने दिल्यावर त्यांना ६ मे २०१३ ला गोंदिया शहरातील मनोहर म्युनिसीपल हायस्कूल शाळेत नियुक्ती देण्यात आली.त्यांची वयोमानानुसार ३० नोव्हेंबर २०१६ रोजी सेवानिवृत्ती झाली. त्यांची मधातल्या काळातील सेवा ग्राह्य धरण्यात यावे यासाठी त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती.त्यांची मागणी न्यायालयाने ऐकूण त्यांना त्या सेवेचे २० लाख रुपये देण्याचे आदेश न्यायालयाने १९ नोव्हेंबर २०२१ ला दिले होते.परंतु गोंदियाचे माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष केल्याने त्यांच्या कार्यालयाची जप्ती करण्यात आली आहे. निलकंठ भुते यांचा १५ वर्षाचा कालावधी न्यायालयाने ग्राह्य धरला. या १५ वर्षाचे वेतन ३४ लाख ११ हजार ४ रुपये होते.

न्यायालयाने २० लाख रुपये देण्यात यावे असे आदेश दिले होते. परंतु या आदे-शाला न जुमानणाऱ्या माध्यमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, प्रभारी उपशिक्षणाधिकारी दिघोरे यांची खुची व संगणक साहित्य जप्त करण्यात आले.

२० लाख रुपये तीन महिन्याच्या आत द्यावे अन्यथा ८ टक्के व्याजदराने ती रक्कम देण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. तीन महिने सोडा दिड वर्ष लोटूनही न्यायालयाचे न ऐकणाऱ्या माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयावर जप्तीची कारवाई प्रमुख बेलीफ डी.टी. शहारे, बेलीफ डी.बी. नागपुरे यांनी केली.

## रब्बी धान विक्रीकरिता ऑनलाईलन नोंदणी करावी

**गोंदिया,** शासकीय आधारभूत धान खरेदी योजनेअंतर्गत रब्बी पणन हंगाम २०२२-२३ मधील धान खरेदीकरिता एनईएमल पोर्टलवर शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्याकरिता १५ मे २०२३ पर्यत मुदतवाढ मिळालेली आहे. शेतकऱ्यांनी रब्बी धान विक्रीकरिता स्वत: ऑनलाईलन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी विजय इंगळे यांनी केले आहे.

# ग्रामपंचायत गंगाझरी ने केला नियमित कर्ज भरणा करणाऱ्या नागरिकांचा सत्कार

**गोंदिया :** ग्रामपंचायत गंगाझरी येथे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून नियमित कर भरणा करणाऱ्या नागरिकांचा सत्कार जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महिला व बालकल्याण सभापती सविता पुराम देखील उपस्थित होत्या. ग्रामपंचायत स्वायत्त संस्था असून ग्रामपंचायत मार्फत साफसफाई तसेच इतर मुलभूत सुविधा नागरिकांना पुरवल्या जातात. मात्र कर भरणा वेळेवर होत नसल्यामुळे ग्रामपंचायतीच्या विकासात अडथळा निर्माण होतो. नियमित कर भरणा करणाऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करुन ग्रामपंचायतीने सुरु केलेल्या



अभिनव उपक्रमामुळे कर गोळा अधिक जलद गतीने होईल. असा विश्वास जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी व्यक्त केला.

दरम्यान महिला बचत गटाच्या कार्यालयाचे उद्घाटन देखील जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यालयाच्या माध्यमातून बचत गटाला नवी भरारी मिळेल तसेच काही मदत लागल्यास जिल्हा परिषद सदैव आपल्या पाठीशी आहे असा विश्वास उपस्थित महिला बचत गटाच्या सदस्यांना दिला.

यावेळी जि.प. सदस्य अश्विनीताई पटले, पं.स. सदस्य वंदनाताई पटले, पं.स. सदस्य अजाबराव रिनायत, तिजेशजी गौतम, संजूभाऊ पटले प्रथम नागरिक, उपसरपंच सेविकाताई आगासे, माजी पं.स. सदस्य प्रकाशजी पटले, ग्रा.प. सदस्य राजेशजी कटरे, महेंद्र धुर्वे, रामसिंग पंधरे व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## रावणवाडी येथे २४ मे रोजी जत्रा योजनांची कार्यक्रम

**गोंदिया:** शासकीय योजना लोकाभिमुख करुन त्यांची अंमलबजावणी गतिमान करण्यासाठी ङ्गजत्रा शासकीय योजनांची - सर्वसामान्यांच्या विकासाचीफ हे अभियान गोंदिया तालुक्यातील रावणवाडी येथे सदर शिबिराचे आयोजन दिनांक २४ मे रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजता पर्यत रावणवाडी येथेच निश्चित करण्यात आले आहे. सदर अभियानांतर्गत शासकीय योजनांशी निगडीत कार्यालयाचे प्रतिनिधी व विविध दस्तऐवज उपलब्ध करुन देणारे अधिकारी व कर्मचारी एका छताखाली एकत्र येऊन विविध योजनांचा लाभ देणार आहेत. सदर बाबीकरीता लागणारे शुल्क हे शासकीय शुल्क भरावे लागणार आहे.

## गाळमुक्त धरण गाळ युक्त शिवार योजनेंतर्गत अशासकीय संस्थांनी प्रस्ताव सादर करावा

गोंदिया: महाराष्ट्र राज्य हे देशात जास्त धरणे व जलसाठे असलेले राज्य आहे. दरवषी साठवत असलेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. शासनामार्फत धरणामधील गाळ काढून शेतामध्ये वापरण्याकरिता ङ्गगाळमुक्त धरण गाळयुक्त शिवारफ ही योजना राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्व धरणांमधील गाळ उपसा करुन शेतात पसरविल्यास धरणांची मुळ साठवण क्षमता पुनःस्थापित होण्याबरोबरच कृषी उत्पन्नात वाढ देखील होईल.

सर्व जलस्त्रोतात गाळ साठणे ही क्रिया कायमस्वरूपी असल्याने सदर योजना राज्यात तीन वर्षापर्यत मर्यादित न राहता कायमस्वरुपी राबविण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

# स्वाभिमान शून्य ठेवून जीवन जगण्यापेक्षा श्रमाच्या कष्टातून आपले अमूल्य जीवन फुलवावे : आ.चंद्रिकापुरे

**अर्जुनी मोरगाव:** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन प्रवास हा अत्यंत संघर्षमय होता. शोषित पीडित, दिन दलित समाज हेच माझे कुटुंब परिवार आहे, असे समजून त्यांच्या उद्धारासाठी आपले जिवन सर्मपित केले. देशातील सर्व समाजाला संविधानाच्या चौकटीत आणून समान अधिकार, आरक्षण देऊन देश एकसंघ ठेवला. प्रत्येकांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आत्मसात करुन समाजात बंधुत्व व समताधिष्ठीत समाजाची भावना निर्माण करावी. भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या विचाराची जाणीव करुन घेणे हि काळाची गरज आहे.



समाजातील प्रत्येक व्यक्तीने महामानव यांचे विचार आणि आचार अंगीकार करता येत नसतील तर समाजाची प्रसंगी व्यक्तीची प्रगती ही शून्य होते. परिस्थितीवर मात करून आपल्या समाजातील मुल ही प्रचंड ताकदीने शिक्षण घेऊन नोकरी करत आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी मदत करीत आहेत. स्वाभिमानाने जिवन जगण्यासाठी आयुष्यात मेहनत घ्यावी लागते. त्यामुळे स्वाभिमान शून्य ठेऊन जगण्यापेक्षा श्रमाच्या कष्टातुन आपले अमूल्य जिवन फुलवावे असे मत आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी व्यक्त केले.

भिमशक्ती मंडळ, रमाबाई भिमज्योती महिला मंडळ राज-ोली/ भरनोली च्या संयुक्त विद्यमाने प्रज्ञाशिल बौध्द विहार राजोली येथे आयोजित गौतम बुद्ध, महात्मा जोतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व मातोश्री रमाई आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अना-वरण प्रसंगी ५ मे रोजी उदघाटक म्हणुन आ.चंद्रिकापुरे बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी समाज कल्याण सभापती राजेश नंदागवळी होते. ध्वजारोहक म्हणून जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा शिक्षण व आरोग्य सभापती मा.इंजि यशवंत गणवीर, प्रमुख वक्ते म्हणुन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रशेखर ठवरे, सरपंच जयश्री मस्के, उपसरपंच सदानंद टेकाम, नगरपंचायत गटनेता दाणेश साखरे, मुन्नाभाई नंदागवळी साहित्यिक, अशोक इंदुलकर माजी जिल्हा परिषद सदस्य, डॉ.चंद्रशेखर बांबोंडे, राजू मेश्राम, संजय रामटेके, रेखा पालीवाल, मेर्शाम मॅडम कॉंग्रेस, चरणदास कराडे, योगेश टेंभुर्णे, नेताजी सुकारे, शॉपिंग खा पठाण, गोपाल मस्के, रामलाल कुंभारे,देवा कोरेती प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी चारही महापुरुषांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकुन विस्तृत मार्गदर्शन केले.

सर्वप्रथम जिल्हा परिषद शाळा येथुन धम्म रॅली काढण्यात आली. त्यानंतर प्रज्ञाशिल बुध्द विहारात महापुरुषांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले व सर्व महामानवांना अभिवादन करण्यात आले. विहारात भंते सोमं यांचे वाणीतुन बुध्द वंदना व त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले. अनावरण सोहळ्याचे प्रास्ताविक नरेश मेश्राम तर संचालन संजय कांबळे यानी तर उपस्थितांचे आभार सिध्दार्थ डोंगरे यांनी मानले.

# अवकाळी पावसामुळे झालेल्या पीक नुकसानीचे पंचनामे करुन मोबदला द्या

**गोंदिया:-** मागील काही दिवसांपासून संपूर्ण जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि काही भागात झालेली गारपिट यामुळे धान, मक्का, भाजीपाला, फळबागा या सर्वांचे अतोनात नुकसान झालेले असुन शेतकरी मोठ्या संकटात सापडलेला आहे. तसेच सातत्याने होत असलेल्या रिमझिम पाऊस यामुळे मोठ्या प्रमाणावर मातीची घरे व गुरांचे गोठयांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांची व सामान्य जनतेच्या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून भरपाई देण्यात यावी यासंबंधीचे निवेदन माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शिष्टमंडळाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

जिल्हयात सुमारे ३० हजार हेक्टरवर उन्हाळी धानाचे पिक असुन मोरगाव अर्जुनी व सडक अर्जुनी या दोन तालुक्यात धान पिकाला पर्याय म्हणुन शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर मक्का या पिकाची लागवड केलेली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात शेतकऱ्यांना नगदी पिके म्हणुन भाजीपाल्याची लागवड सुध्दा केलेली आहे. परंतु काही दिवसापासुन सातत्याने अवकाळी पाऊस होत असल्याने धान, मक्का, भाजीपाला, फळबागा या सर्वांचे अतोनात नुकसान झालेले असुन शेतकरी मोठ्या संकटात सापडलेला आहे. या सर्वांचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने सरसकट मदत करण्याच्या मागणीचे निवेदन जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस च्या वतीने मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांना



मा.जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्या मार्फत देण्यात आले. अवकाळी पाऊसात झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी व सामान्य जनतेत आक्रोश निर्माण झालेला आहे त्यामुळे शासनाच्या वतीने तात्काळ पाहुल उचलून पंचनामे करावेत व शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी अन्यथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटी तीव्र आंदोलन करेल असा इशारा यावेळी देण्यात आला.

प्रामुख्याने सर्वश्री राजेंद्र जैन, गंगाधर परशुरामकर, सुरेश हर्षे, राजलक्ष्मी तुरकर, पूजा सेठ, विशाल शेंडे, बालकृष्ण पटले, किशोर तरोने, केवल बघेले, लोकपाल गहाणे, यशवंत परशूरामकर, अविनाश काशिवार, प्रभाकर दोनोडे, रफिक खान, प्रेमकुमार रहांगडाले, किरण कुमार पारधी, शंकरलाल टेंभरे, विनीत सहारे, सचिन शेडे, राजकुमार जैन, अखिलेश सेठ, मयूर दरबार, सय्यद इकबाल, मोहन पटले, हेमकृष्ण संग्रामे, टी एम पटले, राजेश तुरकर, पन्नालाल डहारे, योगेश नाकाडे, चंद्रकुमार चुटे, एकनाथ वहिले, सुनील पटले, शैलेश वासनिक, दानिश साखरे, नागो बन्सोड, निप्पल बरय्या, आरजू मेश्राम, तुषार ऊके, किशोर ब्राह्मणकर, विनोद चुटे, धनेश्वर तिरेले, यादोराव तरोणे, लक्ष्मण नागपुरे, कांतीकुमार बागडे, विजय रहांगडाले, दीपक कनोजे, रौनक ठाकूर, वामन गेडाम, शरद मिश्रा, कपिल बावनथडे, कुणाल बावनथडे, अरमान जयस्वाल, दर्पण वानखेडे, गौरव शेंडे, नरेंद्र बेलगे सहित मोठ्या संख्येने पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

# आर्यांचे पंचतत्व हे माणसाला गुलाम बनविण्याचे साधन-इंजि.अरविंद माळी

**गोंदिया :-** विदेशी आर्यानी बुद्धीबल, धनबल, बाहुबल, मनोबल आणि सांस्कृतिक इतिहासाचे खच्चीकरण करुन याचं पंचतत्वाच्या बळावर माणसाला गुलाम बनविले, विदेशी आर्यांचे पंचतत्व माणसाला गुलाम बनविण्याचे साधन आहेत, असा हल्ला सामाजिक प्रबोधनकार इंजि. अरविंद माळी यांनी चढविला. गोंदियात बुद्धजयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात (दि.६) श्री माळी बोलत होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक सामाजिक जयंती उत्सव समितीच्या वतीने भीमनगर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी जयंतीचे अध्यक्ष नानाजी शेंडे हे होते. मंचावर उपायुक्त धनंजय वंजारी, विश्वरत्न डॉ आंबेडकर जयंतीचे अध्यक्ष अक्षय वासनिक आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना इंजि.माळी म्हणाले की, बुद्ध हे कोण्या व्यक्तीचे नांव नाही तर ती उपाधी आहे. तथागत म्हणजे मार्गदाता होय, असे सांगून बुद्ध बोलले तसेच ते चालले असेही ते म्हणाले. बुद्धांसमोर विदेशी आर्य आणि चार्वाक यांच्या दोन संस्कृती उभ्या होत्या. आर्यांनी प्रतिपादित केलेले विचार जसे की माणसाला मागच्या जन्मात केलेले पापाचे प्रायश्चित करावे लागते तर चार्वाक संस्कृती सांगायची की व्यक्तीच्या मागच्या जीवन जगण्यावर नाही तर वर्तमान जगण्यावर विचार व्हावा. देवावर विश्वास ठेवणारे



आस्तिक आणि विश्वास न ठेवणारे नास्तिक, अशीही विचारध-ारा बुद्धासमोर होती. या दोन्ही विचारधारेचा अभ्यास बुध्दाने केला. श्री माळी पुढे म्हणाले की अस्तित्वात नसलेल्या गोष्टी मान्य करणे म्हणजे आस्तिक आणि अमान्य करणे म्हणजे नास्तिक असा युक्तिवाद त्यांनी केला. बुद्धाने निसर्ग, ग्रह आणि मानवी मेंदूचाही अभ्यास केला. सूर्य, पृथ्वी यांच्याशी माणूस कसा संलग्न आहे हेही बुद्धाने सांगितले. बुद्ध हा जगाचा पहिला वैज्ञानिक असून जे कळते ते ज्ञान आणि त्याची मांडणी करणे म्हणजे विज्ञान होय, असा बुद्धांचा उपदेश होता.

या प्रसंगी बोलताना उपायुक्त वंजारी यांनीही विचार मांडले, ते म्हणाले की, इतिहास सांगणे आणि अमलात आणणे हे दोन्ही वेगळे प्रकार आहेत. राजकारणामध्ये धम्माचे कसे महत्व आहे, हे पटवून देऊन मानवकल्याणासाठी धम्माची आवश्यकता आहे, यामुळेच भारत विश्वगुरू बनेल अशी ग्वाही त्यांनी दिली. बुद्धिजम अंगीकारल्या शिवाय राजकारण करणे अपयशी ठरेल, असा युक्तिवादही त्यांनी केला.

याप्रसंगी लोकशाहीर संभाजी भगत यांनी प्रबोधपर संगीत जलसा कार्यक्रम सादर केला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

बुद्ध जयंती दिनी शहरात देखाव्यासह भव्य मिरवणूक काढण्यात आली. "बुद्ध धम्म की क्या पहचान-मानव मानव एक समान" या उदघोषनेने गोंदिया नगरी दुमदुमली.कार्यक्रमाचे संचालन ॲड. एकता गणवीर आणि डॉ. राजेश उके यांनी केले. विलास वासनिक यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भीमसैनिकांनी अथक परिश्रम केले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.


## ग्रामपंचायत कार्यालय कन्हाळगाव
### पंचायत समिती अर्जुनी/मोर., जिल्हा परिषद, गोंदिया
### निविदा सुचना क्रमांक १/ सन २०२२-२३

ग्रामपंचायत कन्हाळगाव ता. अर्जुनी/मोर. च्यावतीने खालील कामाच्या निविदा दोन लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद गोंदिया/भंडारा कडील योग्य त्या वर्गातील पंजीबदय कंत्राटदाराकडून निविदा मागवण्यात येत आहे.

| कामाचे नाव | कामाची किंमत (लाखात) | निविदा विक्री किंमत | निविदा सोबत भरावयाची अग्रीम सुरक्षा १% | कमाचा कालावधी | कंत्राट धारकाची वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|
| १)100% FHTC TO WATER SUPPLY SCHEME AT-KANHALGAON (जल जीवन मिशन २०२१-२२) | ५,३३,५२८/- | १००/- | ५३३५/- | १२ महिना | वर्ग १ ते ९ |

**निविदा प्रसिद्धी तपशील:-**
१) निविदा विक्री व स्वीकृती १०/०५/२०२३ सकाळी १०.०० ते १६/०५/२०२३ दुपारी ०५.०० वाजेपर्यंत. २) तांत्रिक लिफाफा उघडून कागद तत्राची तपासनी १७/०५/२०२३. ३) निदि उघडणे १७/०५/२०२३ दुपारी १२.०० वाजता. किंवा ग्रा.पं.च्या सोयीनुसार. ४) बी १ फॉर्म ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध राहील. ५) निविदेच्या अटी व शर्ती ग्रा.पं.कन्हाळगाव च्या नोटीस बोर्डवर लावण्यात येतील.

**सरपंच** ग्रामपंचायत कन्हाळगांव

**ग्रामसेवक** ग्रामपंचायत कन्हाळगांव

# शासकीय धानाचे छत्तीसगडला जाणारे दोन ट्रक तहसीलदारांनी पकडले,मात्र डीएमओंने सोडले

**गोंदिया:-** जिल्ह्यातील शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेले धान जिल्ह्यातील राईसमिलमध्येच मिलींग करावयाचे असताना सालेकसा तालुक्यातून छतीसगड राज्यात हमीभावात खरेदी केलेले धान भरडाईकरीता ट्रक क्रमांक सीजी ०८ एए ६६४१,सीजी ०८ झेड ८८३२ ने जात असताना सालेकसा तहसिलदारांच्या पथकाने शुक्रवार (दि.५) ला पकडून पोलिसांच्या स्वाधिन केले होते. ते ट्रक शनिवारला ट्रकचालकांच्या बयाणाच्या विपरीत राईस मिलर्सनी जिल्हा पणन अधिकारी यांना दिलेल्या बयाणाच्या आधारावर पोलीस ठाण्यातून सोडण्यात आले.यामुळे याप्रकरणात सखोल चौकशीची गरज निर्माण झालेली आहे. ट्रकचालकानी धान छत्तीसगडला घेऊन चालल्याचे सांगितल्याची माहिती सालेकसाचे तहसिलदार नरसैय्या कोंडगुर्ले यांनी दिली.

दरम्यान सालेकास पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक बाळासाहेब बोरसे यांना विचारणा केली असता काल ट्रक जमा करण्यात आले होते,मात्र शनिवारला प्रशासनाच्या निर्देशानुसार सोडण्यात आल्याचे सांगितले.



सालेकसा तालुक्यातील एका शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेला धान उचल करुन तांदुळ तयार करण्याकरीता जिल्हा पणन अधिकारी गोंदिया यांनी सडक अर्जुनी तालुक्यातील शेंडा येथील राईस मिलच्या नावे डीओ आदेश दिले.तो डीओ आदेश घेऊन ट्रकचालक त्या धान खरेदी केंद्रावर पोचल्यानंतर संबधित संस्थेने डीओनुसार त्या ट्रकला धान दिले.ते धान घेऊन सदर ट्रक हे सडक़ अर्जुनी तालुक्यातील शेंडा येथील राईस मिलमध्ये न जाता ते छत्तीसगडच्या दिशेने ट्रक सीजी ०८ एए ६६४१,सीजी ०८ झेड ८८३२ हे जात असताना सालेकसा औद्योगीक प्रशिक्षण संस्थेजवळ पकडण्यात आले होते. सालेकसा तहिसलदार यांनी सदर ट्रक थांबवून विचारपूस केल्यावर सदर धान शासकीय केंद्रातून छत्तीसगड येथे नेले जात असल्याचे ट्रकचालकाने सांगितले. त्यानुसार तहसिलदारांनी सदर ट्रकचालकांना ट्रक सालेकसा पोलीस ठाण्यात जमा करण्यास सांगितले.

तर जिल्हा पणन अधिकारी इंगळे यांना विचारणा केली असता त्यांनी सदर धान हे शासकीय धान खरेदी केंद्रावरीलच होते असे सांगितले.तसेच राईस मिलमालकांनी चुकीने ट्रक चालक छत्तीसगडच्या दिशेने झाल्याचे लेखी निवेदनात सांगितल्याचे म्हणाले. मग छत्तीसगडच्या दिशेने जाणारे ट्रक अचानक कसे सोडण्यात आले, प्रश्न उपस्थित झाला असून असा प्रकार सालेकसा,आमगावसारख्या सीमावती तालुक्यात मोठ्या प्रमाणात होत असावा यास दुजोरा मिळाला आहे.

# दिव्यांग बांधवांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे-पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

**गोंदिया :** दिव्यांग बांधवांनी आपल्याला कधीही कमी लेखू नये. कारण दिव्यांग व्यक्ती सुध्दा प्रत्येक क्षेत्रात चांगले काम करुन यश संपादन करीत आहेत. आपला कुणी वाली नाही असे दिव्यांग बांधवांनी मनात विचार ठेऊ नये. दिव्यांग बांधवांच्या पाठीशी राज्य शासन खंबीरपणे उभे आहे. असे प्रतिपादन राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. पोवार बोर्डीग, न्यू लक्ष्मीनगर, गोंदिया येथे ८ मे रोजी आयोजित ङ्गदिव्यांगांना साहित्य वाटप शिबीरफ कायक्रमाचे उद्घाटक प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खासदार सुनिल मेंढे हे होते.

विशेष अतिथी म्हणून खासदार अशोक नेते, आमदार विजय रहांगडाले, प्रमुख अतिथी जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले, विशेष अतिथी जि.प.समाज कल्याण समिती सभापती पुजा सेठ, महिला व बालकल्याण समिती सभापती सविता पुराम, वित्त व बांधकाम सभापती संजय टेंभरे, माजी आमदार केशवराव मानकर, माजी जि.प.अध्यक्ष नेतराम कटरे, त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निखील पिंगळे मंचावर उपस्थित होते.

केंद्र शासनाने दिव्यांग बंधू-भगिनींसाठी अनेक कल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांच्या जीवनात आनंद निर्माण होऊन अमुलाग्र बदल घडून येतांना दिसत आहे. राज्य शासनाने नुकताच बजेटमध्ये निराधार, वृध्द व दिव्यांगांसाठी दर महिन्याला १५०० रुपये देण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेत सर्वसामान्यांसाठी



मर्यादा आता ५ लक्ष रुपये करण्यात आली आहे व केंद्र शासनाप्रमाणे राज्य शासनही आता शेतकऱ्यांना वार्षिक ६ हजार रुपये अनुदान स्वरुपात देणार आहे. दिव्यांग बांधवांच्या जीवनामध्ये चैतन्य निर्माण करण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितले. जिल्ह्यातील सर्व तालुक्यात दिव्यांगांसाठी शिबिरे घेऊन दिल्ली येथील डॉक्टरांच्या चमुकडून योग्य ती तपासणी करुन मोजमाप करुन घेण्यात आले. यात जिल्ह्यातील एकूण १३७८ लाभार्थी पात्र ठरले आहेत. त्यांचे सर्व साहित्य आलेले असून जिल्ह्यातील प्रत्येक तालुकास्थळी शिबिरे आयोजित करुन पात्र लाभार्थ्यांना साहित्य स्वरुपात सी.पी.चेअर, ट्रायसिकल व्हील चेअर, स्मार्ट फोन प्लस स्मार्ट केन, हिअरींग साहित्य वितरीत करण्यात येणार आहे असे खासदार सुनिल मेंढे यांनी सांगितले.

दिव्यांगांना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांचे आयुष्य सुखकर करण्यासाठी त्यांना आवश्यक असलेले साहित्य वितरीत करण्यात येत आहे. जिल्हा प्रशासन दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी सज्ज असल्याचे जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी सांगितले. प्रातिनिधीक स्वरुपात जयसिंग बघेले, श्रेयण नागपुरे, अजय ढेकवार, योगेश्वर डोहरे, मयंक बागडे, अभिषेक बरडे, प्रमोद भिसे, कार्तिक बारई, विशाल कटरे व धनराज कांबळे यांना मान्यवरांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले.

भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खासदार सुनील मेंढे यांच्या मार्फत गोंदिया जिल्हयातील दिव्यांग व्यक्तींना एडीआयपी योजनेंतर्गत मोफत साहित्य साधने व उपकरणे पुरविणेसाठी तालुकानिहाय मोजमाप शिबीरांचे आयोजन माहे सप्टेंबर २०२२ मध्ये करण्यात आले होते. सदर मोजमाप शिबीरामध्ये गोंदिया जिल्हयातील तालुकानिहाय एकुण १३७८ दिव्यांग लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. तिरोडा १६१, गोरेगाव ३०९, देवरी ०३, आमगाव २५, सालेकसा १३, अर्जुनी/मोरगाव १९२, सडक अर्जुनी २२१ व गोंदिया ४५४ अशा एकूण १३७८ दिव्यांग लाभार्थ्यांचा यात समावेश आहे असे प्रास्ताविकातून जिल्हा समाज कल्याण अधिकारी संजय गणवीर यांनी सांगितले.

कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, गटविकास अधिकारी डॉ.वेदप्रकाश चौरागडे, न.प.उपअभियंता अनिल दाते, समाज कल्याण विभागाच्या सहायक सल्लागार वैशाली तायडे व आकाश मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन जयंत शुक्ला यांनी केले तर उपस्थितांचे आभार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन कापसे यांनी मानले. कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रलंबीत तकारींचा निपटारा तातडीने करा-खासदार सुनिल मेंढे

**गोंदिया:** जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी "जनता दरबार' आयोजित करुन तक्रारींचा निपटारा करण्याचा प्रयत्न करण्यात येत असून संबंधित विभागाने प्रलंबीत तक्रारींचा निपटारा तातडीने करावे, असे निर्देश खासदार सुनिल मेंढे यांनी दिले.

गोंदिया येथील पंचायत समिती सभागृहात ८ मे रोजी खासदार सुनिल मेंढे यांच्या अध्यक्षतेखाली "जनता दरबार' आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते.

जि.प.अर्थ व बांधकाम समिती सभापती संजय टेंभरे, सर्व जि.प. सदस्य, पं.स. सदस्य, माजी जि.प. अध्यक्ष नेतराम कटरे, उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, गटविकास अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे यावेळी मंचावर उपस्थित होते.



या जनता दरबारात प्रधानमंत्री आवास योजना, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत अभियान, किसान सम्मान निधी योजना, उज्वला योजना, आयुष्यमान भारत योजना, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, मुद्रा लोन, जननी सुरक्षा योजना आदी योजनांचा यावेळी आढावा घेण्यात आला.

यावेळी विविध प्रकारच्या तक्रारी सादर करण्यात आल्या. यामध्ये घरकुल मंजूर झाला आहे परंतू निधी उपलब्ध झालेला नाही अश्या बऱ्याच लोकांच्या तक्रारी होत्या. घरकुल बाबत "ड' यादी अंतिम झालेली नाही त्यामुळे आपल्याला वेळ लागणार आहे. मनरेगाची कामे अद्याप सुरु झालेली नाहीत. याबाबत जिल्हा प्रशासनाकडून शासनाकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे असे सांगण्यात आले. स्मशानभूमीचा रस्ता खाजगी जागेतून जात आहे, याबाबत चौकशी करुन उपविभागीय कार्यालयामार्फत तक्रारीचा निपटारा करण्यात यावा. बिरसी विमानतळ येथे ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादीत करण्यात आलेली आहे त्या शेतकऱ्यांना अजुनपर्यंत भूसंपादनाचा मोबदला मिळालेला नाही अशी तक्रार करण्यात आलेली आहे. मोबाईल टॉवरला ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचा अधिकार ग्राम पंचायत ठराव नुसार निर्णय घेण्यात येते असे यावेळी सांगण्यात आले. तक्रारकर्त्यांची संबंधित यंत्रणेने दखल घेऊन तातडीने चौकशी करावी.

२००५ पासून अतिक्रमणमध्ये घर बांधले असता घर तोडण्यात आले. याबाबत पुनर्वसन पॉलिसी शासन ठरवित असते असे उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांनी सांगितले.

ग्रामपंचायत सेजगाव येथे पंधराव्या वित्त आयोगामधून कामे झालेली नसून निधीची उचल करण्यात आलेली आहे. याबाबत सखोल चौकशी करण्यात यावी असे निर्देश खासदार सुनिल मेंढे यांनी दिले.

जनता दरबाराच्या माध्यमातून आपण लोकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रलंबीत प्रकरणांचे निराकरण करण्यात येईल अशी ग्वाही यावेळी खासदार सुनिल मेंढे यांनी दिली.

कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (रोहयो) लिना फलके, तहसिलदार मानसी पाटील, नायब तहसिलदार सीमा पाटणे, तालुका कृषी अधिकारी धनराज तुमडाम व विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी तक्रारकर्त्यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.



## सरपंच परिषद महाराष्ट्राच्या गोंदिया जिल्हा अध्यक्षपदी तिजेश गौतम

**गोंदिया :** सरपंच परिषद मुंबई, महाराष्ट्राचे अधिवेशन साईनगर शिर्डी येथे संपन्न झाले असून नवीन जबाबदाऱ्या देण्यात आल्या. परिषदेत गोंदिया जिल्हा समन्वयक म्हणून कार्यरत तिजेश गौतम यांची नियुक्ती गोंदिया जिल्हाध्यक्ष पदी करण्यात आली असून औपचारिक घोषणा प्रदेश अध्यक्ष दत्ता काकडे यांनी राज्य पदाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत केली. तिजेश गौतम गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव (पा.) ग्रामपंचायतीचे उपसरपंच असून त्यांनी दुसऱ्यांदा ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून येण्यात यश मिळवले आहे. दरम्यान सरपंच परिषदेचे ध्येय आणि धोरणाला अनुसरुन कार्य करणार असल्याचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष तिजेश गौतम यांनी सांगितले.

# जिल्ह्यात कृषी मिशन सुरू करा-पालकमंत्री मुनगंटीवार

## खरीप हंगाम पूर्व आढावा,अप्रमाणित बियाणे विक्री केंद्रावर कारवाई करा

**गोंदिया:** रोजगारामध्ये सर्वात मोठे योगदान कृषी क्षेत्राचे आहे. राज्यातील २ कोटी ५५ लाखांपेक्षा जास्त लोकांचे जीवन शेतीवर अवलंबून आहे. पारंपरिक शेती सोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करण्यावर भर असावा. अन्न प्रक्रिया उद्योग, फलोत्पादन, मत्स्यतळे, सेंद्रिय शेती, यंत्र शेती, दुग्धयोजना, माती परीक्षण, शिंगाडा शेती व ड्रोन फवारणी या सारखे नाविन्यपूर्ण प्रयोग करुन जिल्ह्यात कृषी मिशन सुरूकरावे, अशा सूचना राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित खरीप हंगाम पूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, खासदार सुनिल मेंढे, खासदार अशोक नेते, आमदार विजय रहांगडाले, विनोद अग्रवाल, मनोहर चंद्रिकापूरे, जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यात बियाण्यांचा व खताचा तुटवडा होणार नाही याकडे विशेष लक्ष देण्यात यावे असे त्यांनी सांगितले. अप्रमाणित व नकली बियाणे विकणाऱ्या विक्री केंद्रावर कारवाई करण्याचे निर्देश दिले. मागेल त्याला युरिया आणि तेही ताबडतोब असे धोरण राबविण्यात यावे असे पालकमंत्री म्हणाले.

पीक विम्याचा लाभ शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मिळावा यासाठी निकषात व अटी शर्थीत बदल करण्याची मागणी यावेळी लोकप्रतिनिधींनी केली. पीक विमा योजनेबाबत लोकप्रतिनिधींची कार्यशाळा घेण्याची सूचना पालकमंत्र्यांनी केली. नुकत्याच झालेल्या पावसामुळे शेतीचे नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतीचे सरसकट पंचनामे करण्याचे निर्देश त्यांनी कृषी विभागाला दिले. राष्ट्रीयकृत बँकांनी पीक कर्ज वाटप करण्यासाठी तालुकास्तरीय मेळावे घेण्यात यावेत असे त्यांनी सांगितले. यासाठी नाविन्यपूर्ण योजनेतून निधी देण्यात येईल असे ते म्हणाले.

जिल्ह्यातील १४२१ मामा तलावाची मोजणी व सीमांकनासाठी दहा कोटी निधीची आवश्यकता असून यासाठीचा प्रस्ताव वित्त विभागाला पाठविण्यात यावा असे पालकमंत्र्यांनी सांगितले. झाशीनगर उपसा सिंचन योजनेच्या टेस्टिंगसाठी अखंड वीज पुरवठा देण्याचे निर्देश त्यांनी वीज विभागाला दिले. जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान १३२६.५४ मि.मी. ऐवढे असून गोंदिया जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ५ लाख ६४ हजार १०० हेक्टर असून २ लाख २७ हजार २२५ हेक्टर लागवडीलायक क्षेत्र आहे. त्यापैकी खरीप हंगाम सरासरी क्षेत्र १ लाख ८९ हजार



२३० हेक्टर ऐवढे आहे. त्यापैकी १ लाख ८१ हजार ०७७ हेक्टर क्षेत्र खरीप भाताचे आहे. खरीप हंगाम सन २०२३ -२४ साठी २ लाख ४ हजार ३५८ हेक्टर लक्ष्य प्रस्तावित आहे. सन २०२२-२३ मध्ये जिल्ह्यात १८३४.८३ मि.मी. पाऊस पडला.

**२०२२-२३ मधील उपलब्धी :-**

सन २०२१-२२ चे तुलनेत २०२२-२३ मध्ये जिल्हा गोंदिया मध्ये भात पिकाची उत्पादकता ४ क्विंटलने वाढ. (२० क्विं वरुन २४ क्विं) सन २०२१-२२ चे तुलनेत २०२२-२३ मध्ये महात्मा गांधी फळबाग लागवड क्षेत्रामध्ये (५०० हे. वरुन १९४९.०७ हे.) झाली. सन २०२१-२२ चे तुलनेत २०२२-२३ ज्वारीचे पेरणी क्षेत्रात वाढ (१४९.७५ हे. वरुन ३५६.७० हे.) झाली. सन २०२१-२२ चे तुलनेत २०२२-२३ करडईचे पेरणी क्षेत्रात वाढ (३२३.५० हे. वरुन ५६५.८० हे.) झाली.

**रासायनिक खतांची मागणी :-**

खरीप हंगाम सन २०२२-२३ मध्ये युरिया, डीएपी, एसएसपी, एमओपी, एनपीके व मिश्र खते मिळून ६९ हजार ८५२ मेट्रिक टन खताची विक्री झाली होती. खरीप हंगाम सन २०२३-२४ साठी १ लाख २१ हजार ५३ मेट्रिक टन खताची मागणी आहे. आयुक्तालयाकडून ६९ हजार ३२० मेट्रिक टन आवंटन मंजूर असून मागिल वर्षाचा ३४ हजार ५०७ मेट्रिक टन साठा शिल्लक असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी दिली.

खरीप हंगाम सन २०२२ मध्ये ३४ हजार ५७९ क्विंटल बियाण्यांचा वापर करण्यात आला. या हंगामात महाबीज व खाजगी मिळून ४९ हजार ६७० क्विंटल बियाण्यांची मागणी नोंदविण्यात आली आहे.

**पीक कर्ज वाटप :-**

खरीप हंगाम सन २०२२-२३ मध्ये जिल्ह्याला ४४४.८५ कोटी लक्षांक प्राप्त झाला होता. ५२५१८ सभासदांना ३०७.८३ कोटींचे पीक कर्ज वाटप करण्यात आले. कर्ज वाटपाची टक्केवारी ६९.२० टक्के एवढी आहे. यावर पालकमंर्त्यांनी नाराजी व्यक्त केली. सन २०२३-२४ साठी ४६८.२४ कोटी लक्षांक असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्ज वाटप करण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी सादरीकरण केले.

# आता ग्रामपंचायतींचे कर स्वीकारणार ऑनलाईन

**गोंदिया:-** ग्रामपंचायतींच्या कर वसुलीचा वेळेत योग्य विनीयोग व्हावा, या उद्देशाने ग्रामपंचायतींचे कर ऑनलाईन स्विकारण्याचा निर्णय जिल्हा परिषदेच्या २ मे रोजी झालेल्या स्थायी समितीच्या सभेत घेण्यात आला आहे. जिल्हा परिषद अध्यक्षांनी ऑनलाईन कर स्विकारण्याची संकल्पना सभेत मांडली. त्याला सर्व सदस्यांनी एकमताने सहमती दर्शविली. सध्याचे युग माहिती व तंत्रज्ञानाचे आहे.



ऑफलाईन सोडून आता ऑनलाईन माध्यमातून सारी कामे होत आहे. मात्र ग्रामपंचायत स्तरवर होणारे कर अद्यापही ऑफलाईनच गोळा करण्यात येते. त्यामुळे कराची गोळा झालेली रक्कम वेळेत जिल्हा परिषदेकडे पोहोचत नाही. तसेच ग्रामीण भागात ग्रामपंचायत स्तरावर बऱ्याच अडचणी निर्माण होतात. ग्रामपंचायत स्तरावर ऑफलाईन पद्धतीने सर्व प्रकारचा भरणा नागरिक करतात. यामध्ये ग्रामपंचायत परिचर व ग्रामसेवकाकडे कर वसुलीची रक्कम बराच कालावधीपर्यंत पडून राहते. त्यानंतर ती रक्कम पंचायत समितीमार्फत जिल्हा परिषदेला पाठविण्यात येते. यात बराच वेळ जातो. त्यामुळे कराची रक्कम थेट खात्यात जमा व्हावी, यासाठी जिल्हा परिषद अध्यक्षांनी ऑनलाईन कर स्विकारण्याची संकल्पना मांडली. त्याला सर्व सदस्यांनी एकमताने सहमती दर्शविली. तसेच ऑनलाईन कर वसुलीसाठी सॉफ्टवेअर विकसीत करण्यात येणार असून यामुळे प्रशासनासोबतच नागरिकांचाही मोठा फायदा होणार आहे.

# ओबीसी जनगणनेला घेऊन विदर्भात दोन टप्प्यात निघणार मंडल यात्रा

**नागपूर:** ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी समाजासह सर्वांचीच जातनिहाय जनगणना भारत सरकारने करुन संविधानिक हक्क अधिकार व वाटा देण्याच्या मागणीला घेऊन यावर्षीही मंडल यात्रा दोन टप्यात काढण्यात येणार आहे. या मंडल यात्रेदरम्यान विद्यार्थ्यांना "मंडल आयोगाबाबत जागृती करीत त्यांना त्यांचे अधिकार आणि हक्क समजावून सांगण्यात येणार आहे. पहिल्या टप्यात विदर्भातील सात जिल्ह्यात मंडल आयोग जनजागृती यात्रा काढण्याचा निर्णय येथील एमटीडीसीच्या सभागृहात रविवार (दि.०७) ओबीसी संघटनाच्या झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

यात्रेचा पहिल्या टप्याची सुरवात ३० जुलैला संविधान चौक नागपूर येथून होणार आहे. नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यातून प्रवास करत चंद्रपूर शहरात मंडल दिवशी ७ऑगस्टला यात्रेच्या पाहिल्या टप्प्याचा समारोप होणार आहे. तर दुसरा टप्पाची सुरवात २० ऑगस्टला राजमाता जिजाऊ जन्मस्थळ सिंदखेडराजा जिल्हा



बुलढाणा येथून करण्यात येणार असून अकोला, वाशिम जिल्ह्यातून प्रवास करत २५ ऑगस्टला मंडल जयंतीच्या दिवशी भाऊसाहेब उपाख्य डॉ.पंजाबराव देशमुख नगरी अमरावती येथे दुस?या टप्प्याचा समारोप करण्यात येणार आहे.

या संदर्भात झालेल्या ओबीसी संघटनांच्या बैठकीला भंडारा, गोंदिया, नागपूर, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, आणि नागपूर ग्रामीण येथील कार्यकर्ते मंडल यात्रा संयोजक उमेश कोर्राम, बळीराज धोटे, माजी खासदार डॉ.खुशाल बोपचे, दीनानाथ वाघमारे, खेमेंद्र कटरे, भुमेश्वर शेंडे, गोपाल सेलोकर, अनिल डहाके, विलास माथनकर, डॉ.अंजली साळवे, अतुल खोब्रागडे सुनील पाल, पियूष आकरे, देवेंद्र समर्थ, मनीष गिरडकर, प्रतीक बावनकर, प्रलय मशाखेत्री, मुकुंद अडेवार, राजेंद्र बढिये, सोनू फटींग, निलेश तिघरे, अरविंद क्षिरसागर, विशाल पटले,उपस्थित होते.

विदर्भात निघणाऱ्या या मंडल यात्रेदरम्यान ओबीसींना जोडण्यासोबतच जातनिहाय जनगणना कशी महत्वाची आहे,हे पटवून देण्यात येणार आहे. ओबीसी व्हीजेएनटी, एसबीसी समाजातील विविध प्रश्न आणि त्यावरील उपायावर चर्चा, विद्यार्थी, युवक, अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये जागृती, ओबीसींचे वसतिगृह, महाज्योतीच्या आणि ओबीसी आर्थिक विकास महामंळाच्या योजना, शिष्यवृत्तीचा लाभ, ओबीसींची जनगणना आदी अनेक विषयावर बैठकीत चर्चा करण्यात आली.

यात्रेच्या माध्यमातून ओबीसी हितासाठी गठित बी.पी. मंडल आयोगाच्या शिफारशींची माहिती ओबीसी समाजाला देऊन या शिफारशी आज परिस्थितीत शासनाने लागू करण्याची आवश्यकता या विषयावर जनजागृती करण्यात येणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी असलेल्या शासकीय योजना, "महाज्योती" संस्थेच्या योजना, ईतर मागासवगीय वित्त महामंडळाच्या योजना, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी परदेशात शिक्षणासाठी असलेल्या शासकीय शिष्यवृत्ती योजना व जागतिक संस्थेच्या शिष्यवृत्ती योजनाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

ओबीसी जनगणना-काळाची गरज यावर प्रकाश टाकून शासनाकडे प्रलंबित ओबीसी समाजाच्या अन्य विकासात्मक मागण्यांच्या पूर्ततेसाठी ओबीसी समाज एकीकरण या प्रमुख हेतूने यात्रेच्या माध्यमातून प्रामुख्याने कार्य करण्यात येणार आहे. सभेत ओबीसी युवा अधिकार मंच, ओबीसी अधिकार मंच, राष्ट्रीय ओबीसी बहुजन महासंघ,संघर्ष वाहिनी, संविधान मंच, स्टुडटंस राईटस असो.सेल्परिसपेक्ट मुव्हमेंट, ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी सेवा संघ,आता लढूया एकीनेच सारख्या अन्य बहुजन ओबीसी संघटनांचा सहभाग होता.

# सात तालुका क्रीडा अधिकारीपदे रिक्त

**गोंदिया:** ग्रामीण भागात क्रिडा क्षेत्राच्या विकासाकरिता प्रत्येक तालुक्यात क्रीडा संकूल तयार करण्यात आले. त्याकरिता तालुका क्रीडा अधिकारी नियुक्त करण्याचा देखील सरकारने निर्णय घेतला. गोंदिया जिल्ह्यात सर्वच तालुका मुख्यलयांवर क्रीडा संकूल आहेत. मात्र दोनच तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची पदे मंजूर करण्यात आली. त्यातही एकच पद भरण्यात आले आहे. उर्वरित सात ठिकाणी केवळ उधारीच्या अधिकाऱ्यांवरच कारभार सुरु आहे. परिणामी क्रीडा विभागाचा कारभार केवळ देखावाच ठरु लागला असून शासनाच्या उद्देशाला खुद्द शासनच हरताळ फासत असल्याचे दिसून येत आहे.

अलिकडच्या काळात खेड्यापाड्यातील तरुण आणि तरुणी विविध प्रकारातील खेळांकडे वळले आहेत. जिल्ह्यातील अनेकांनी राज्य आणि देशपातळीवर देखील प्रदर्शन केले आहे. जिल्हा प्रामुख्याने मागासलेला आहे. देवरी, सालेकसा यासारखे तालुके अत्यंत संवेदनशील आणि दुर्गम आहेत. त्याठिकाणची मुले




आणि मुलगी कणखर आहेत. मैदानी खेळांत त्यांची रूची आहे. मात्र त्यांना सराव आणि तांत्रिक मार्गदर्शनाची गरज आहे. हिच गरज ओळखून राज्य शासनाने जिल्हा मुख्यालयी जिल्हा क्रीडा संकूल तर तालुका मुख्यालयांवर तालुका क्रीडा संकुलांची निर्मिती करण्यात आली. गडगंज इमारती उभारण्यात आल्या. साहित्य देखील पोचते करण्यात आले. मोठे मैदान देखील उपलब्ध करुन देण्यात आले आहे. परंतु जी गोष्ट महत्वाची आहे, त्या प्रशिक्षकांचीच नियुक्ती झाली नसल्याने हा सर्व प्रपंच बिनकामी ठरु लागला आहे.

गोंदिया जिल्ह्यातील आठ तालुक्यांसाठी दोन तालुका क्रीडा अधिकारी पदे मंजूर आहेत. सालेकसा आणि सडक अर्जुनीसाठी ही पदे मंजूर आहेत. मात्र त्यातील एकच पद भरण्यात आले आहे. सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, गोरेगाव आणि तिरोडा तालुक्याचा प्रभार जी जागा भरण्यात आले. त्या तालुका क्रीडा अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे. देवरीचा प्रभार जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी मरस्कोल्हे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तर गोंदिया सालेकसा आणि आमगाव तालुका क्रीडा अधिकारी पदाचा प्रभार जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील प्रशिक्षकांकडे देण्यात आला आहे. सात तालुके तालुका क्रीडा अधिकाऱ्यांपासून वंचित असल्यामुळे क्रीडा विकासात मर्यादा येत आहेत. परिणामी ज्या उद्देशाने क्रीडा संकूल तयार करण्यात आले आहेत, ते उद्देशच सफल होत नसल्याचे दिसून येत आहे. रिक्तपदांमुळे क्रीडा प्रेमींमध्ये नाराजीचा सुर आहे.